नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २८९ * * अकोला * मंगळवार, दिनांक १५ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## नीमचमध्ये ३ जैन मुनींवर काठ्यांनी हल्ला

■ **वृत्तसंस्था, नीमच, दि. १४ :**
मध्य प्रदेशच्या नीमच जिल्ह्यातील सिंगोली पोलीस स्टेशन परिसरात सहा गुंडांनी तीन जैन मुनींवर हल्ला केला. रविवारी रात्री जैन मुनी सिंगोली रोडवरील हनुमान मंदिरात विश्रांतीसाठी थांबले.

रात्री १२ वाजण्याच्या सुमारास आरोपींनी दरोड्याच्या उद्देशाने काठ्या आणि धारदार शस्त्रांनी हल्ला केला. घटनेनंतर लोकांनी घटनास्थळी दोन गुन्हेगारांना पकडले. हल्ल्यात जखमी झालेल्या मुनींनी रुग्णालयात जाण्यास नकार दिला, त्यानंतर त्या सर्वांना जैन स्थानक भवनात ठेवण्यात आले आहे. या घटनेनंतर जैन समाजाने शहर बंदची हाक दिली आहे. त्याचवेळी पोलिसांनी ६ आरोपींना अटक केली आहे.

अग्रलेख

## खरीखरी..

## युद्धखोरी की शांतता

काल जागतिक पटलावर दोन मोठ्या घटना घडल्या. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना शांतीदूत बनायचे आहे. त्यामुळे रशिया आणि इस्त्राइल यांनी प्रतीपक्षावर हल्ले करूच नयेत, असे ट्रम्प यांना वाटते. पण मुजोर इस्त्राइल आणि शिरजोर रशिया सध्या तरी कोणाचे ऐकायच्या मनस्थितीत नाहीत असेच दिसते. इस्त्राइलने चक्क गाझातील रुग्णालयांवर हल्ला केला. तीन रुग्णालयांवर क्षेपणास्त्रांचा मारा केल्यामुळे काही आरोग्य अधिकारी ठार झाले आहेत. तर काही नागरिक जखमी झाले आहेत. तिकडे रशियाने युक्रेनवर बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे डागली. युक्रेनच्या सुमी नावाच्या शहरातील वसाहतींवर रशियाने क्षेपणास्त्रे डागून वीस नागरिकांना ठार केलेले आहे. अनेक जण जखमी आहेत. म्हणजे आता ही दोन युद्धखोर राष्ट्रे आक्रमक आणि अनिर्बंध झालेली आहेत असे दिसते. इस्त्राइल हे अमेरिकेचे अत्यंत लाडके बाळ आहे. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत ज्यू लोकांचा मोठाच दबदबा आहे. त्यामुळे ट्रम्प कितीही शांततेचा राग आडवत असले. तरी इस्त्राइलला वा?यावर सोडणे, अमेरिकेला अजिबात जमणार नाही हे खरे आहे. इस्त्राइलचे सरळसरळ म्हणणे आहे, 'आम्हाला हमासला संपवायचे आहे'. हमासला संपवण्यासाठी जिथे त्यांचा तळ आहे. त्या राफाहला त्यांनी चारी बाजूने वेढा घातलेला आहे. गाझाच्या जनतेने आपल्या भागातून हमासला हकलून देण्याची हीच वेळ आहे, असे इस्त्राइलचे म्हणणे आहे. हमासने आमच्या सर्व ओलिसांना मुक्त केले. तरच आम्ही युद्धविरामाची घोषणा करू. अन्यथा हल्ले सुरूच राहतील, असे इस्त्राइलचे म्हणणे आहे. तिकडे रशियाने युक्रेनच्या शहरांवर हल्ला केलेला आहे. युक्रेनला अमेरिकेच्या अध्यक्षांनी अगदी वाऱ्यावर सोडले असले. तरी युरोपियन देश मदत करीत आहेत. त्यामुळेच की काय रशियाला अजूनही विजय दृष्टीपथात येत नाही असे दिसते. त्यामुळे रशियाने आता नागरी वसाहतींवर हल्ले सुरू केलेले आहेत. रशियाच्या लष्कराने वसाहतींवर क्षेपणास्त्र डागून सामान्य जनतेला आता युद्धात ओढण्याचे ठरवलेले आहे. युक्रेन मधील भारतीय औषध कारखान्यांवरही रशियाने ड्रोनद्वारे हल्ला केला आहे. बदलत्या जागतिक परिस्थितीमध्ये इस्त्रायलचे आक्रमक धोरण आणि रशियाही मोठी झेप घेण्याच्या तयारीत दिसत आहेत. मात्र हे दोन्ही देश परत युद्ध खोरीकडे वळत आहेत. तरीही भारताने नेहमीच शांततेचा पुरस्कार केला आहे. आपले पंतप्रधान रशियाला भेट देऊन आले. पण त्यांच्याही सूचनांचे रशियाने पालन केलेले नाही. सध्याची जागतिक परिस्थिती सुद्धा या लढाईला फारसा प्रतिसाद देईल असे वाटत नाही. ट्रम्प यांना अमेरिकेवरील बलाढ्य कर्ज कमी करायचे आहे. त्यामुळे त्यांनी अमेरिकेतून फुकाच्या हजामती करण्यावर बंदी आणली आहे. आपल्या तुटपुंज्या सामग्रीनिशी युक्रेन अजूनही मस्तपैकी रशियाच्या मोठमोठ्या हल्ल्यांना उत्तर देत आहे. जागतिक शांततेसाठी भारताचे धोरणात्मक निवेदन पंतप्रधानांनी दोन्हीही युद्धजन्य राष्ट्राध्यक्षांकडे केलेले होते. या सर्व गुंतागुंतीच्या प्रकारामुळे भविष्यात जगावर युद्धखोरी लादली जाईल, असे दिसते आहे. एकूण सर्व परिस्थिती बघता शांतता बरीच दूर आहे. असे म्हटले तर ते काही वावगे ठरणार नाही. तरीही आपण शांततेसाठी प्रार्थना नक्कीच करू शकतो. एवढेच आपण ध्यानात ठेवले पाहिजे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# महामानवाला जनसागराची आदरांजली






■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :**
विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त देशभरात त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त नागपूर शहर निळ्या पताका, ध्वज आणि शुभेच्छांच्या बॅनरने सजले होते . तत्पूर्वी, रविवारी सायंकाळपासूनच जयंतीचा उत्साह उफाळून आला होता. रात्री १२ च्या सुमारास संविधान चौकात हजारोंच्या संख्येने जमलेल्या अनुयायांनी केक कापून आदरांजली अर्पण केली. नंतर तरूणाईने तूफान नृत्यही केले.

दरम्यान, सोमवारी सकाळपासूनच नागपूर शहरात ठिकठिकाणी जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पहाटेपासूनच संविधान चौक, दीक्षाभूमी आणि सर्व विहारात नागकिंनी गर्दी करीत बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण केले. सक्करदरा गार्डनमध्ये सकाळी भीमगीत गायनाच्या कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. जयंतीनिमित्त नागपूर शहराच्या अनेक भागात भोजनदान करण्यात आले. सायंकाळच्या सुमारास भव्य मिरवणुका काढण्यात आल्याचे दिसून आले.

## काँग्रेसने मुस्लिमाला अध्यक्ष बनवावे : मोदी

■ **वृत्तसंस्था, हिसार, दि. १४ :**
पंतप्रधान नरेंद्र मोदी आज (१४ एप्रिल) हरियाणा दौऱ्यावर होते. सकाळी १० वाजता त्यांनी हिसारमधील हरियाणाच्या पहिल्या विमानतळाचे उद्घाटन केले. येथून हिसार-अयोध्या विमान उड्डाणाला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. यानंतर पंतप्रधान यमुनानगरला पोहोचले. येथे त्यांनी ८०० मेगावॅट क्षमतेच्या औष्णिक वीज प्रकल्प युनिट, कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पाची पायाभरणी केली आणि रेवाडी बायपासचे उद्घाटन केले.



पंतप्रधान मोदी म्हणाले,देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, वक्फ कायदा २०१३ पर्यंत लागू होता. २०१३ मध्ये काँग्रेसने निवडणुकीत मतदान करता यावे म्हणून कायद्यात सुधारणा केली. हा कायदा अशा प्रकारे बनवण्यात आला की बाबासाहेबांचे संविधान उद्ध्वस्त झाले. जर त्याचा योग्य वापर केला असता तर मुस्लिमांना पंक्चर बनवत राहण्याची गरज पडली नसती. पंतप्रधान पुढे म्हणाले, काँग्रेस म्हणते की हे मुस्लिमांच्या हितासाठी केले गेले. मी विचारू इच्छितो की जर काँग्रेस पक्षाला मनापासून मुस्लिमांबद्दल थोडीशीही सहानुभूती असेल तर त्यांनी एका मुस्लिमाला त्यांच्या पक्षाचा अध्यक्ष बनवावे, परंतु त्यांचे नेते असे काहीही करणार नाहीत. त्यांना फक्त देशातील नागरिकांचे हक्क हिरावून घ्यायचे आहेत.

पंतप्रधान मोदी म्हणाले, आता हरियाणातील श्रीकृष्णजींची पवित्र भूमी श्रीरामजींच्या भूमीशी, अयोध्येशी थेट जोडली गेली आहे. लवकरच हिसारहून इतर शहरांसाठीही विमानसेवा सुरू होईल. माझे वचन आहे की हवाई चप्पल घालणारेही विमानातून प्रवास करतील.

गेल्या १० वर्षांत, कोट्यवधी भारतीयांनी आयुष्यात पहिल्यांदाच विमानाने प्रवास केला आहे. ज्या ठिकाणी चांगली रेल्वे स्थानके नव्हती तिथेही आम्ही नवीन विमानतळ बांधले आहेत. २०१४ पूर्वी देशात ७४ विमानतळ होते, ७० वर्षांत ७४. आज देशातील विमानतळांची संख्या १५०च्या पुढे गेली आहे.

पंतप्रधान म्हणाले, काँग्रेसने बाबासाहेबांसोबत काय केले हे आपण कधीही विसरू नये. काँग्रेसने त्यांना दोनदा निवडणुकीत पराभूत करून त्यांचा अपमान केला. काँग्रेस संविधानाचा नाश करणारी बनली आहे. कर्नाटकच्या काँग्रेस सरकारने एससी, एसटी, ओबीसींचे पेन्शनमधील अधिकार हिसकावून घेतले आणि धर्माच्या आधारावर आरक्षण दिले. काँग्रेसने आपल्या पवित्र संविधानाला सत्ता मिळवण्यासाठी एक शस्त्र बनवले आहे. जेव्हा काँग्रेसवर सत्तेचे संकट आले तेव्हा त्यांनी संविधान चिरडले, संविधानाची भावना चिरडली असा आरोप त्यांनी केला.

## १० लाख घरांमध्ये पोहोचणार राज्यघटनेची उद्देशिका




घर घर संविधान' मोहिमेचा नागपुरात प्रारंभ : पालकमंत्री बावनकुळेंच्या हस्ते शुभारंभ

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :**
नागपूर जिल्ह्यातील १० लाख घरांमध्ये भारतीय राज्यघटनेची उद्देशिका पोहोचवण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू झाला आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त सामाजिक समता सप्ताहाअंतर्गत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. दीक्षाभूमी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर ऑडिटोरियममध्ये झालेल्या कार्यक्रमाला वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, खासदार शामकुमार बर्वे आणि महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर उपस्थित होते.

कार्यक्रमात विविध योजनांचे लाभ वितरित करण्यात आले. यामध्ये रमाई आवास घरकुल, स्वाधार योजना, तृतीयपंथीयांना ओळखपत्र आणि विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

पालकमंत्री बावनकुळे यांनी विविध संस्थांना निधी वितरित केला. शांतीवन चिचोली येथील भारतीय बौद्ध परिषदेला २.४७ कोटी, कामठी येथील ओगावा सोसायटीला ५.९४ कोटी, गुरुचरण दास स्वामी मठाला ५२.३१ लाख, प्रज्ञा मैत्री प्रतिष्ठानला ७.०२ कोटी रुपये देण्यात आले. स्टँडअप इंडिया योजनेअंतर्गत मेघा इंटरप्रायजेसच्या श्रीमती माया मेश्राम यांना ५.०३ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला.

डॉ. आंबेडकरांच्या जीवनाशी निगडित स्थळे नव्या पिढीसाठी शक्तिस्थळे असल्याचे सांगून या स्थळांचे जतन शासनाकडून केले जाणार असल्याचे पालकमंत्र्यांनी जाहीर केले.

## वक्फ कायद्यावरून प. बंगालमध्ये हिंसाचार

### पोलिसांची वाहने जाळली : आंदोलकांनी महामार्ग रोखला

■ **वृत्तसंस्था**
**कोलकाता, दि. १४ :**
वक्फ (दुरुस्ती) विधेयकाविरोधात पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबादमध्ये झालेल्या हिंसाचारानंतर आता २४ परगण्यात निदर्शक आणि पोलिसांमध्ये संघर्ष सुरू आहे. बसंती महामार्गावरील बारामपूर येथे पोलिसांनी इंडियन सेक्युलर फ्रंट कार्यकर्त्यांना घेऊन जाणारे वाहन थांबवल्यानंतर ही दंगल उसळली.



निषेधादरम्यान सकाळी १० वाजता भांगर, मिनाखा, संदेशखली येथील आयएसएफ कार्यकर्ते आणि स्थानिकांनी महामार्ग रोखला होता. रामलीला मैदानात जाणाऱ्या कार्यकर्त्यांनी पोलिसांना घेरले. त्यांना पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला.


महामार्गावरील परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली, परंतु संतप्त जमावाने शोनपूरमध्ये पाच पोलिसांच्या दुचाकींची तोडफोड केली आणि त्यांना आग लावली. कैद्यांना घेऊन जाणारी व्हॅन उलटून तोडफोड करण्यात आली.

हे कार्यकर्ते कोलकात्यातील रामलीला मैदानावर होणाऱ्या जाहीर सभेला उपस्थित राहणार होते. भाजप आणि तृणमूल काँग्रेस दोघेही पश्चिम बंगालमध्ये एकमेकांवर आरोप करीत सुटले आहेत.

## आरएसएसचा सरसंघचालक दलित, मुस्लीम कधी करणार?

हर्षवर्धन सपकाळ यांचा सवाल

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १४ :**
नेहरूंनी बाबासाहेबांना सन्मानाने देशाच्या पहिल्या कायदा मंत्रिपदाची जबाबदारी दिली. आज काँग्रेस पक्षाचा अध्यक्षही दलित समाजाचा आहे. पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सरसंघचालक दलित, मुस्लीम किंवा महिला कधी करणार? असा थेट सवाल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केला आहे.



सपकाळ म्हणाले की, मोदींनी काँग्रेस पक्षाबद्दल केलेले वक्तव्य अत्यंत हास्यास्पद आहे, या विधानाचा मी जाहीर निषेध करतो. काँग्रेस पक्षाने देशासाठी दिलेले योगदान अधोरेखीत झालेले आहे. काँग्रेसला जाज्वल्य इतिहास आहे, हे मोदीच काय कोणीही नाकारू शकत नाही. काँग्रेस सरकारच्या काळात साक्षरतेपासून अंतराळापर्यंत प्रगती केलेली आहे.

सपकाळ म्हणाले, नरेंद्र मोदी हे ११ वर्षांपासून सत्तेत आहेत, या ११ वर्षांत त्यांनी देशाचे काय भले केले? हे त्यांनी जाहीर करावे. त्यांनी हिंदू-मुस्लीम, दलित-सवर्ण-ओबीसी यांच्यात द्वेष निर्माण करण्याचेच काम केले असा आरोप त्यांनी केला.

## गुजरातमध्ये १८०० कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त

■ **वृत्तसंस्था, पोरबंदर, दि. १४ :**
गुजरातमध्ये, भारतीय तटरक्षक दलाने ३०० किलो ड्रग्ज जप्त केले आहेत, ज्याची किंमत सुमारे १,८०० कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते.

जप्त केलेले ड्रग्ज मेथाम्फेटामाइन असू शकतात. गुजरात दहशतवाद विरोधी पथक (एटीएस) आणि तटरक्षक दलाने १२-१३ एप्रिलच्या रात्री संयुक्त कारवाईत पोरबंदरपासून १९० किमी अंतरावर समुद्रातून ड्रग्जचा एक साठा जप्त केला.

गुजरात एटीएसकडून माहिती मिळाल्यानंतर, तटरक्षक दलाने शोधासाठी आंतरराष्ट्रीय सागरी सीमा रेषेकडे एक जहाज पाठवले होते. अंधारात तटरक्षक दलाच्या पथकाला एक बोट दिसली. पथकाने बोट स्वारांना त्यांची ओळख सांगण्यास सांगितले. यामुळे घाबरून, तस्करांनी ड्रग्ज समुद्रात फेकून दिले आणि आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून पळून गेले.

तटरक्षक दलाच्या पथकाने बचाव बोटीच्या मदतीने समुद्रात टाकलेल्या ड्रग्जचा साठा बाहेर काढला. या बोटीचा पाकिस्तानशी संबंध असल्याचा संशय आहे. सध्या जप्त केलेले ड्रग्ज तपासासाठी पोरबंदरमधील एटीएसकडे सोपवण्यात आले आहेत.

गुजरात आता ड्रग्ज तस्करीसाठी एक महत्त्वाचा मार्ग बनत आहे. गेल्या वर्षी एप्रिल २०२४ मध्येही आयसीजीने पोरबंदरजवळ ८६ किलो ड्रग्ज (६०० कोटी) जप्त केले होते.

## फरार मेहुल चोकसीला अटक?

■ **वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. १४ :**
पंजाब नॅशनल बँकेच्या कर्ज घोटाळ्यातील आरोपी फरार हिरे व्यापारी मेहुल चोकसीला बेल्जियममध्ये पोलिसांनी अटक केली आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, केंद्रीय अन्वेषण ब्युरोच्या अपीलवरून चोकसीला अटक करण्यात आली. सध्या तो तुरुंगात आहे. भारताने बेल्जियममधून चोकसीच्या प्रत्यार्पणाची प्रक्रिया सुरू केली आहे. चोकसीवर १३,८५० कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप आहे. गेल्या महिन्यात मेहुल चोकसी बेल्जियममध्ये लपल्याचे उघड झाले. तेथील परराष्ट्र मंत्रालयाने एका अधिकृत निवेदनात चोकसीच्या देशात उपस्थितीची माहिती दिली होती.

चोकसीला अटक करताना पोलिसांनी दोन ओपन-एंडेड अटक वॉरंटचा उल्लेख केला. हे मुंबई न्यायालयाने जारी केले होते. या २३ मे २०१८ आणि १५ जून २०२१ च्या तारखेच्या होत्या, असे



अहवालात म्हटले आहे. असे मानले जाते की चोकसी त्याच्या खराब प्रकृती आणि इतर कारणांमुळे जामीन आणि तात्काळ सुटकेची मागणी करू शकतो.

त्याने १५ नोव्हेंबर २०२३ रोजी त्याच्या बेल्जियन नागरिक पत्नीच्या मदतीने बेल्जियन 'एफ रेसिडेन्सी कार्ड' मिळवले. चोकसीने बेल्जियमच्या अधिकाऱ्यांना बनावट कागदपत्रे सादर केली होती आणि त्याच्या नागरिकत्वाबाबतची तथ्ये लपवली होती, असा दावा अहवालात करण्यात आला आहे. त्यांनी त्यांच्या भारतीय नागरिकत्वाची माहितीही उघड केली नाही.

## वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरची मला ऑफर...

### निलंबित पोलिस अधिकारी रणजित कासलेंचे सीएम फडणवीसांसह शिंदे, पवारांवर आरोप

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**
वाल्मीक कराडचा एन्काऊंटर करण्यासाठी ५ कोटी ते ५० कोटी रुपयांची ऑफर देण्यात आली होती, असा दावा बीडचे निलंबित पोलिस अधिकारी रणजित कासले यांनी केला आहे. कासले यांनी सोशल मीडियावर व्हिडिओ पोस्ट करून म्हटले आहे की, मी एन्काऊंटर करू शकतो. माझ्यात दम होता. हे त्यांना माहिती होते म्हणून त्यांनी सायबरमधून तिकडे बोलवून घेतले.

कासले पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे केवळ बीडला घाबरतात. ते तिथे येत नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदींची तिथे सभा झाली, पण फडणवीस आले नाहीत. पोलिस अधिकारी म्हणून मला गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांची लाज वाटते. १० वर्षात त्यांनी काय केले. त्यांच्या पत्नी पोलिसांच्या पैशावर आपला खर्च भागावतात असा आरोपही त्यांनी केला आहे.

रणजित कासले म्हणाले की, एन्काऊंटर करण्यापूर्वी मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्री आणि गृह सचिवांची एक गुप्त बैठक होते. या बैठकीत ठरवले जाते की प्रकरणामध्ये काय करायचे. मग एक ५ ते ६ विश्वासू लोकांची टीम तयार केली जाते. मग ठरलेल्या ठिकाणी जातात. यामध्ये पोलिसांची टीम तयार केली जाते. त्यांना ५ कोटी ते ५० कोटी अशी ऑफर दिली जाते, यासह आमचे सरकार आहे तुम्हाला पुन्हा नौकरीमध्ये घेतले जाईल, चौकशीमधून तुम्हाला बाहेर काढू असे आश्वासन दिले जाते.





**गृहमंत्र्यांना आरोपी करा**

रणजित कासले म्हणाले की, अक्षय शिंदे प्रकरणात ५ पोलिसांवर गुन्हे दाखल करा, एसआयटी बसवा, अशी बातमी मी टीव्हीवर बघितली. ही एसआयटी बसवून काहीही उपयोग होणार नाही. एसआयटीची बसवायची असेल तर केंद्राची एसआयटी बसवा, तरच यामधून सत्य समोर येईल.

त्यांचे हातपाय बांधलेले होते यातून तो बोगस एन्काऊंटर होता असा आरोप कासले यांनी केला आहे. तर हे सरकार आणि विरोधक नंपुसक आहेत, अक्षय शिंदे प्रकरणी आरोपी करायचे असेल तर ते गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केले पाहिजे.

**धनंजय मुंडेंची ऑफर असावी**

रणजित कासले यांच्या या दाव्यावर करुणा मुंडे यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. करुण मुंडे यांनी कासलेंची री ओढली. दारूच्या नशेत माणूस खरे बोलतो. धनंजय मुंडेंनी कराडच्या एन्काउंटरची ऑफर दिली असेल, असे त्या म्हणाल्या. वाल्मीक कराड हा धनंजय मुंडे यांच्या खूप जवळचा आहे, धनंजय मुंडेंचे सगळे काळे कारनामे वाल्मीक कराडकडे आहेत आणि आज तो अडकला आहे. वाल्मीकला जन्मठेप किंवा फाशीची शिक्षा होणार आहे, धनंजय मुंडेंनी एन्काउंटरची ऑफर दिली असेल, असे करुणा शर्मा यांनी म्हटले आहे.





श्री बालाजी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. राजुरा
संस्थापक अध्यक्ष श्री. सिद्धार्थ पथाडे, उपाध्यक्ष श्री. अभिषेक गंपावार व सर्व संचालक गण व कर्मचारी वृंद यांच्याकडून
विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त समस्त जनतेला हार्दिक शुभेच्छा!

# एसटीचा प्रवास आणखी महागणार?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :** महाराष्ट्राच्या परिवहन व्यवस्थेची जीवनरेषा असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवाशांना लवकरच तिकिटांच्या दरवाढीचा आणखी एक फटका बसण्याची शक्यता आहे. आधीच महागाईने त्रस्त असलेल्या सामान्यांच्या खिशावर नवीन साफसफाई अधिभाराचा भार पडण्याची चिन्हे आहेत. वाहतूक विभागाने एसटी बसच्या तिकिटांवर साफसफाई कर लादण्याचा प्रस्ताव सादर केल्याची माहिती आहे.

मागील काही महिन्यांपासून एसटीच्या प्रवाशी संख्येत लक्षणीय घट झाली आहे, ज्याचा थेट परिणाम महामंडळाच्या उत्पन्नावर झाला आहे. यंदा २५ जानेवारीपासून सर्व प्रकारच्या बस सेवांमध्ये 14.95 टक्क्यांची भाडेवाढ लागू करण्यात आली होती.

या निर्णयाला जनतेने तीव्र विरोध दर्शवला, तरीही भाडेवाढ मागे घेण्यात आली नाही. आता नवीन प्रस्तावानुसार, प्रत्येक तिकिटावर एक रुपयाचा साफसफाई अधिभार लावला जाण्याची शक्यता आहे. यामुळे प्रवाशांचा आर्थिक बोजा आणखी वाढणार आहे.

एसटी महामंडळाला शासनाकडून अनुदान आणि परतावा वेळेवर मिळत नसल्याने आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याशिवाय, डिझेलच्या किमती, देखभाल खर्च आणि कर्मचारी भत्त्यांमुळेही महामंडळावर आर्थिक दबाव आहे.



साफसफाई अधिभारामुळे प्रवाशांवर नवीन बोजा

साफसफाई अधिभाराच्या प्रस्तावामुळे बसगाड्यांची स्वच्छता सुधारेल, अशी अपेक्षा असली, तरी प्रवाशांमध्ये याबाबत नाराजी पसरत आहे. एका प्रवाशाने सांगितले, आधीच तिकीट महाग झाले आहे, आता अधिभार लादून सामान्य माणसाला आणखी त्रास दिला जात आहे.

या प्रस्तावावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही, परंतु तो लागू झाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थी, कामगार आणि ज्येष्ठ नागरिकांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

सध्या दररोज लाखो प्रवासी वाहतूक करणाऱ्या एसटी महामंडळाला उत्पन्नवाढीसाठी पर्याय शोधावे लागत आहेत. मात्र, प्रवाशांच्या हिताला प्राधान्य देण्याची मागणीही जोर धरत आहे. भाडेवाढ केल्यास प्रवाशांच्या संतापाचा उद्रेक होवू शकतो . याबाबत परिवहन मंत्र्यांकडून स्पष्टीकरणाची अपेक्षा आहे.

## एसटी बसचा ठावठिकाणा आता मोबाईलवर

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) आपल्या प्रवाशांना अत्याधुनिक सुविधा देण्यासाठी सज्ज झाले आहे. येत्या महिन्याभरात एसटी बसचा ठावठीकाणा मोबाईल ॲपद्वारे कळणार असल्याची ग्वाही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. या ॲपमुळे प्रवाशांना लोकल ट्रेनप्रमाणे बस कुठपर्यंत पोहोचली आहे, हे थेट मोबाईलवर पाहता येईल.

मुंबईत महामंडळाच्या मुख्यालयात अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर सरनाईक यांनी ही घोषणा केली. ते म्हणाले, सर्व १५,००० बसेसना जीपीएस यंत्रणा बसवण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. येत्या दोन महिन्यांत हे पूर्ण होईल, तर ॲप पुढील महिन्यातच उपलब्ध होईल. सध्या १२,००० बसेसना जीपीएस बसवले असून, उर्वरित ३,००० बसेसचे काम लवकरच पूर्ण होणार आहे. यापूर्वी २०१९ मध्ये तत्कालीन परिवहनमंत्री दिवाकर रावते यांनी असा उपक्रम हाती घेतला होता, परंतु तो अपूर्ण राहिला.

या ॲपद्वारे प्रवासी बसचे नेमके स्थान, मार्ग, आणि आगमन-प्रस्थान वेळ जाणून घेऊ शकतील. याशिवाय, आपत्कालीन परिस्थितीत मदत मिळवण्यासाठी ॲपमध्ये विशेष सुविधाही असेल. सरनाईक यांनी ठेकेदाराला जीपीएस बसवण्यात उशीर झाल्यास कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. तसेच, नवीन बसेसना जीपीएस आणि सीसीटीव्हीसह सुसज्ज करण्याचे निर्देश दिले आहेत.

ही सुविधा प्रवाशांचा वेळ वाचवेल आणि प्रवास अधिक सुकर करेल. दररोज ६० लाख प्रवाशांना सेवा देणाऱ्या एसटी महामंडळाच्या या पावलामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत क्रांती येण्याची अपेक्षा आहे. प्रवाशांनी या ॲपचे स्वागत केले असून, लवकरात लवकर सुविधा उपलब्ध व्हावी, अशी मागणी केली आहे.

## अंबादास दानवे काड्या करतो...



■ **छ. संभाजीनगर :** शिवसेना ठाकरे गटाचे नेते व विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पक्षाच्या मेळाव्याचे आयोजन केले होते. याला माजी खासदार चंद्रकांत खैरे उपस्थित नव्हते. तसेच खैरे यांनी त्यांच्या गैरहजेरीवर भाष्य करताना अंबादास दानवे यांच्यावर आरोप केले आहेत. त्यामुळे अंबादास दानवे आणि चंद्रकांत खैरे यांच्यातील वाद पुन्हा एकदा समोर आला आहे. अंबादास मोठा झाल्यासारखा वागतो आहे. शिवसेना मी वाढवली, हा नंतर आला आणि काड्या करण्याचे काम करतोय, अशी टीका चंद्रकांत खैरे यांनी केली आहे.

खैरे म्हणाले, कालच्या पक्षाचा कार्यक्रम बाबत मला कुणी सांगितले नव्हते, मला कार्यकर्त्यांसोबत बोलायचे होते. मात्र मी नसताना यांनी कार्यक्रम उरकवून टाकला. मला आमंत्रण नव्हते, मला विचारायला हवे होते. मला डावलून कसे चालेल? कुणी गटबाजी करत असेल तर मला मान्य नाही. मी मरेल पण पक्ष सोडणार नाही. अंबादास मोठा झाल्यासारखा वागतोय. तो आता दोन चार महीनेच असणार आहे. या माणसांमुळे शिवसेनेतील अनेक लोक फुटले, या माणसाने काय केले सांगा, असा सवालही खैरे यांनी उपस्थित केला.

## फुलेंना केवळ कर्मठ ब्राह्मणांचा विरोध



**मुंबई :** फुले सिनेमा गेल्या काही दिवसांपासून वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. सिनेमा ११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीदिनी प्रदर्शित होणारा होता. फुले सिनेमाच्या प्रदर्शनाची तारिख २५ एप्रिलपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. चित्रपटाला ब्राह्मण महासंघाने विरोध केला आहे. ब्राह्मण महासंघाच्या विरोधानंतर सेन्सॉर बोर्डानेही त्यांची री ओढली आहे.

दरम्यान यावर बोलताना छगन भुजबळ म्हणाले की, फुले सिनेमातील एकही सीन कट होता कामा नये, त्यावेळी सगळेच ब्राह्मण महात्मा फुलेंविरोधात नव्हते, केवळ काही कर्मठ ब्राह्मणांनी त्यांना विरोध केला होता, एक ही सीन कट करू नका. सत्य आहे तेच दाखवले आहे. महात्मा फुले यांच्या संबंधित लिहिलेल्या ग्रंथ,पुस्तकातले आणि फुले यांनी लिहिलेले दाखवले जात आहे. आम्ही आजच्या ब्राह्मणांना सॉफ्ट टार्गेट करीत नाही. आम्ही ब्राह्मणविरोधी नाही. सर्व ब्राह्मण फुले यांच्या विरोधात नव्हते. कर्मठ ब्राह्मणांचा विरोध होता. बहुजन लोक अंधश्रदेत होते त्यावेळी काय परिस्थिती होती? दलितांची परिस्थिती कुणी नाकारू शकत नव्हते, असे छगन भुजबळ म्हणाले. फुले चित्रपट सर्वांनी पाहिला पाहिजे. त्या वेळचा इतिहास समजून घेतला पाहिजे. जातीयवाद करून इतरांना कमी लेखणाऱ्यांनी हा चित्रपट पाहणे आवश्यक आहे.

## पुण्यात नववधूची आत्महत्या

**पुणे :** पतीच्या जाचाला कंटाळून पत्नीने पंख्याला गळफास घेउन आत्महत्या केली आहे. ही घटना धायरीतील गजानन संकुलमध्ये घडली आहे. पत्नीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पतीविरुद्ध नांदेड सिटी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मल्लीकार्जुन मयाप्पा चलवादी (२६, रा. धायरी, पुणे) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी भिमाप्पा चौडप्पा चलवादी (५३, रा. मुंढवा,पुणे) यांनी फिर्याद दाखल केली आहे.

भिमाप्पा यांच्या मुलीचे आणि मल्लीकार्जुन यांचे काही महिन्यापुर्वी लग्न झाले होते. लग्नानंतर आरोपी पती मल्लीकार्जुनने पत्नीला त्रास देण्यास सुरूवात केली. सततच्या मानसिक त्रासाला कंटाळून भिमाप्पा यांच्या मुलीने घरातील पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी पत्नीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी पोलिसांना आरोपी मल्लीकार्जुन विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक स्वप्नाली गायकवाड तपास करीत आहेत.

## डॉ. घैसास यांना मेडिकल कौन्सिलची नोटीस

**पुणे :** ईश्वरी ऊर्फ तनिषा भिसे मृत्युप्रकरणात महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलने दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे अधीक्षकांना पत्र पाठवून याप्रकरणात सहभागी असलेल्या डॉक्टरांची माहिती मगितली होती. त्यानंतर रुग्णालयाकडून याबाबतचा सविस्तर अहवाल पाठविण्यात आला. त्याआधारे भिसे यांच्यावर उपचार केलेल्या डॉ.सुश्रृत घैसास यांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिनले नोटीस पाठवली आहे. सदर नोटीसला चार दिवसात उत्तर द्यावे असे देखील सांगण्यात आलेले आहे.

ईश्वरी भिसे या २०२० पासून दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात डॉ.घैसास यांच्याकडे मूल होत नसल्याने उपचार घेत होत्या. २०२२ मध्ये त्यांच्या दोन्ही बीजाशयाच्या कर्करोग उपचारासाठी शस्त्रक्रिया देखील झाली. २०२३ मध्ये डॉक्टरांनी त्यांना तुम्हाला सुखरुप गर्भधारणा व प्रसृती होण्याची शक्यता नसल्याने मूल दत्तक घेण्याचा सल्ला दिला होता. परंतु त्यानंतर भिसे यांनी इंदिरा आयव्हीएफ मध्ये उपचार घेत जुळे बाळ ठेवले होते. याबाबतची कल्पना डॉ. घैसास यांना नव्हती परंतु भिसे यांना त्रास होऊ लागल्याने त्या डॉ. घैसास यांच्याकडे २८ मार्च रोजी उपचारासाठी गेल्या होत्या. त्यावेळी गुंतागुंतीची शस्त्रक्रिया असल्याने दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने दहा लाख रुपये भरणा केला तरच दाखल करुन घेण्यात येईल असे सांगण्यात आले व त्यांना साडेपाच तास बसवून ठेवण्यात आले. तसेच त्यांना पैसे नसतील तर ससून रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला होता.

त्यानुसार भिसे या ससून रुग्णालयात गेल्या परंतु तेथील परिस्थिती पाहून त्यांनी सदर ठिकाणी दाखल न होता, सुर्या हॉस्पिटल दाखल झाल्या. त्याठिकाणी २९ मार्च रोजी त्यांची सिझेरियन प्रसृती झाली व त्यानंतर त्यांचा दुदेर्वी मृत्यु झाल्याचा प्रकार घडला. याप्रकरणात डॉ. घैसास यांच्यावर रुगणाकडे दहा लाख रुपयांची मागणी करुन, पैसे न भरल्याने उपचार सुरु केले नाही त्यामुळे त्यांचा मृत्यु झाल्याचा आरोप आहे. त्यामुळे याप्रकरणात डॉ.घैसास यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी भिसे कुटुंबाने देखील केली आहे. डॉ. घैसास यांच्यावर ठपका ठेवण्यात आल्याने पोलिसांकडून याबाबत गुन्हा दाखल होणार का? हे आता पहावे लागणार आहे.

## स्मारकाचे काम न होणे हे दुर्दैव



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :** इंदू मिल परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारक संदर्भात शरद पवार यांनी मोठ्या प्रमाणात पाठपुरावा केला होता. मात्र, आता तीन वर्षे झाले तरी देखील अपेक्षित काम झालेले नाही हे दुर्दैव असल्याचे खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

हे काम तातडीने आणि चांगल्या दर्जाचे होण्याची अपेक्षा आहे. अशा कामांमध्ये जी प्रगती अपेक्षित होती, ती प्रगती झालेली नसल्याचे देखील सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने सुप्रिया सुळे यांनी चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस अभिवादन केले. यावेळी त्या प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या.

चैत्यभूमी, दादर येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. ही छायाचित्रे पाहताना त्यांचा जीवनप्रवास आपल्यापुढे उलगडत जातो. एका महामानवाची जडणघडण कशी झाली हे समजून येण्यासाठी ही छायाचित्रे अतिशय महत्त्वाची असल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त चैत्यभूमी, दादर येथे जाऊन सुळे यांनी आंबेडकर यांच्या स्मृतींना कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. या वेळी सुळे म्हणाल्या की, 'त्यांनी दाखवून दिलेल्या मार्गानेच देशाची खऱ्या अर्थाने प्रगती होऊ शकते.त्यांचे विचार आगामी पिढ्यांना सदैव मार्गदर्शन करीत राहतील, असे त्या म्हणाल्या.

## भीम जैसा सूरज अगर निकला न होता...

### एकनाथ शिंदेंचे बाबासाहेबांना शायरीतून अभिवादन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त शुभेच्छा देत विनम्र अभिवादन केले आहे. यावेळी

भीम जैसा सूरज
अगर निकला न होता,
हमारे जीवन में ये
उजाला न होता,

असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी शायरीमधून बाबासाहेबांच्या प्रति भावना व्यक्त केल्या आहेत.



एकनाथ शिंदे म्हणाले, भारताच्या संविधानचे शिकल्पकार, युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १३४ वी जयंती आहे. या निमित्ताने मी बाबासाहेबांच्या तमाम अनुयायांना शुभेच्छा देतो व या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेबांना देखील विनम्र अभिवादन करतो. बाबासाहेबांनी सर्वसामान्य दलित, शोषित, पीडित, अन्यायग्रस्त यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले आणि समता, बंधुता आणि त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवण्याचे काम केले.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, बाबासाहेब यांचा जन्म आपल्या भारत भूमीत झाला . बाबासाहेब आपला श्वास आहे, बाबासाहेब दीपस्तंभ आहेत. समतेचा संदेश देणारे बाबासाहेब यांनी या देशाला सर्वोत्तम घटना दिली. अनेक देशांच्या घटनेचा अभ्यास करून आपल्या देशाची घटना बनवली. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचला पाहिजे, ही भावना त्यांनी मनात ठेवली होती.

मर गए होते युही जुल्म सहकर
अगर हमे भीम जैसा
रखवाला मिला न होता...

अशा शायरीमधून एकनाथ शिंदे यांनी आपले विचार डॉ. बाबासाहेबांच्या प्रति व्यक्त केले.

बाबासाहेब एवढे विद्वान होते की अमेरिकेतल्या कोलंबियामध्ये ज्ञानाचे प्रतीक म्हणून पुतळा उभा करण्यात आला. तसेच लंडनच्या विद्यापीठातून त्यांनी इकनॉमिकमधून पदवी घेतली. त्यांनी अनेक पदव्या मिळवल्या आहेत. हा भारताचा गौरव आहे. ७५ वर्ष स्वातंत्र्याला झाली, पण काही लोक संविधानाची लाल कोरी डायरी दाखवत फिरतात, असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधला आहे.

ज्या कॉंग्रेसने बाबासाहेबांना नेहमीच पराभूत केले. त्यांना व त्यांच्या विचारांना त्रासही देण्याचे काम केले. २०१४ साली खऱ्या अर्थाने संविधान दिन साजरा होऊ लागला. तोपर्यंत लोक संविधान संविधान म्हणत गळा काढत होते. आणि आपण देखील महाराष्ट्र सरकार तालुकास्तरावर संविधान भवन चालू करणार आहोत. हिंदू बिलमध्ये देखील आनंतर्राष्ट्रीय स्तरवर बाबासाहेबांचे स्मारक उभे राहणार आहे. जगाला हेवा वाटावे असे ते स्मारक उभे राहत आहे. हे देखील अभिमानाची बाब आहे.

आमचे सरकार देखील बाबासाहेबांच्या विचारांवर, छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शाने चालणारे आहे. बाबासाहेबांनी लिहिलेली घटना सर्वसामान्यांना न्याय देणारी घटना आहे. म्हणून सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती या देशाचे पंतप्रधान झाले. शेतकऱ्याचा मुलगा या राज्याचा मुख्यमंत्री झाला. एक आदिवसी भगिनी या देशाची राष्ट्रपती झाली. ही जादू, किमया बाबासाहेबांच्या घटनेची आहे.

## आईनेच काढले लेकीचे अश्लील व्हिडिओ

### अश्लील व्हिडिओ काढून केले व्हायरल, दोघांना अटक

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १४ :** अल्पवयीन मुलीने आईचे प्रेमसंबंध घरमालकाला सांगितल्यानंतर आईने स्वतःच्या प्रियकरालाच तिच्याशी संबंध ठेवायला लावले. त्यानंतर तिचे अश्लील व्हिडिओही आईने व्हायरल केल्याचा धक्कादायक प्रकार पुण्यातून समोर आला आहे.

या प्रकरणी पोलिसांनी आईसह तिच्या प्रियकराला अटक केली आहे. फक्त प्रियकरच नाही तर नातेवाईकांनाही महिलेने अल्पवयीन मुलीचे फोटो पाठवले. त्यानंतर मुलीसोबत प्रियकर संबंध ठेवायला लावल्याचा भयंकर घटना घडलीय. प्रियकरासह नातेवाईकांना पाठवले व्हिडिओ

पाच महिन्यापूर्वी १३ वर्षीय पीडित मुलीस आरोपी आई भारती कुऱ्हाडे आणि आरोपी प्रियकर गुरुदेव कुमार स्वामी या दोघांमध्ये अनैतिक संबंधाबाबत समजले. अल्पवयीन मुलीने तिच्या आईचे आणि प्रियकराचे संबंध घरमालकाला सांगितले होते. यानंतर संतापलेल्या आईने मुलीचे प्रियकराच्या मदतीने कपडे काढून अश्लील व्हिडिओ शूट केले. एवढ्यावरच आई थांबली नाही तर तिने ते व्हिडिओ प्रियकराला आणि नातेवाईकांना पाठवले. मुलीचे व्हिडिओ व्हायरल केल्यानंतर दोघेही फरार झाले होते. पुण्यातील बिबवेवाडी पोलिस स्टेशनच्या हद्दीत ही संतापजनक घटना घडली आहे.

**पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल**

पोलिसांनी पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला. गेल्या पाच महिन्यापासून मुलीचा आई आणि तिचा बॉयफ्रेंड फरार झाले होते. त्यानुसार पोलिसांनी शोध मोहिम हाती घेतली. पुण्यातील खडकवासला परिसरात ते दोघे लपून बसले होते. त्याची माहिती पोलिसंना मिळाली. त्यानंतर सापळा रचून या दोघांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान विसरता येणार नाही- राज ठाकरे

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १४ :** मुंबईत मराठी भाषेला, मराठी माणसाला दुय्यम दर्जा दिला जात असताना, या लढ्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारख्या उत्तुंग माणसांनी आपली शक्ती खर्ची घातली होती, हे मराठी माणसाने विसरू नये, असे म्हणत संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील बाबासाहेबांचे योगदान हे विसरता येणार नाही, असे म्हणत राज ठाकरे यांनी एक किस्सा आपल्या पोस्टमध्ये सांगितला आहे.



राज ठाकरे पुढे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी त्यावेळी म्हटले होत की, मुसलमानांनी भारतावर-हिंदूंवर आक्रमणं केली म्हणून हिंदू-मुसलमानांची मूळ ओळख पुसली गेली नाही. मुंबईत गुजराती किंवा इतर भाषिक आले म्हणजे मुंबईची मूळ ओळख पुसली गेली असं होत नाही, मुंबईची मूळ ओळख ही मराठी भाषिकांचा प्रांत अशीच आहे

राज ठाकरेंनी म्हटलंय की, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांची आज जयंती. आज या जयंतीनिमीत्त संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या वेळेला बाबासाहेबांनी या लढ्याला कसा पाठिंबा दिला होता आणि इतकेच नाही तर मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र नको म्हणून जे काही तर्क पुढे केले जात होते त्याला त्यांनी कसे सडेतोड उत्तर दिले होते, याचे स्मरण होणे आवश्यक आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या सुरुवातीच्या काळात, कॉम्रेड डांगे, एस.एम. जोशी, आचार्य अत्रे आणि संयुक्त महाराष्ट्र समितीच्या इतर नेत्यांनी, बाबासाहेबांची त्यांच्या दिल्लीतील निवासस्थानी भेट घेतली होती आणि या लढ्यासाठी त्यांचं आणि त्यांच्या अनुयायांचे सहकार्य मागितलं होतं. यावेळेस बाबासाहेबांनी देखील माझा शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन संयुक्त महाराष्ट्र समितीच्या पाठीशी जिब्राल्टरच्या खडकासारखा उभा राहील असं सांगितलं होतं. इतकंच नाही तर पुढे मुंबईतील राजगृह हे संयुक्त महाराष्ट्र समितीच्या बैठकांचे केंद्र बनलं. या बैठकांमध्ये आमचे आजोबा प्रबोधनकार ठाकरे हे देखील उपस्थित असायचे.

राज ठाकरेंनी म्हटले की, स्वतः बाबासाहेबांनी 14 ऑक्टोबर 1948 रोजी धार कमिशनला मराठी भाषिकांसाठी स्वतंत्र राज्य असावे या मागणीला पाठिंबा देणारे निवेदन दिले होते.

या निवेदनात मुंबई हा महाराष्ट्राचाच अविभाज्य भाग कसा आहे, याचे विस्तृत विवेचन आहे. हे सगळे सविस्तर सांगायचे कारण असे की बाबासाहेबांनी पुढे जाऊन मुंबई हा महाराष्ट्राचा भाग कधीच नव्हता किंवा मुंबईत फक्त मराठी भाषिकांची लोकसंख्या अधिक आहे म्हणून मुंबई महाराष्ट्राचा भाग कसा होऊ शकतो असे जे तर्क पुढे केले जात होते त्याला सडेतोड उत्तर दिलं होतं.

ते म्हणाले होते की मुसलमानांनी भारतावर-हिंदूंवर आक्रमणं केली म्हणून हिंदू-मुसलमानांची मूळ ओळख पुसली गेली नाही. मुंबईत गुजराती किंवा इतर भाषिक आले म्हणजे मुंबईची मूळ ओळख पुसली गेली असं होत नाही, मुंबईची मूळ ओळख ही मराठी भाषिकांचा प्रांत अशीच आहे आणि ती बदलता येणार नाही. पुढे बाबासाहेबांचे निधन झाले. पण त्यानंतर दादासाहेब गायकवाड, बॅरिस्टर बी.सी. कांबळे यांच्यासारखे नेते संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात त्वेषाने उतरले. बॅरिस्टर बी.सी. कांबळे यांनी संयुक्त महाराष्ट्र आंदोलकांवर होणाऱ्या पोलिसी कारवायांवर विधानसभेत प्रश्न उपस्थित करून मोरारजी देसाईंना जेरीस आणले होते.

1960 ला मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला. हा प्रसंग पहायला बाबासाहेब नव्हते. पण या लढ्यातील बाबासाहेबांचे योगदान हे विसरता येणार नाही.

## इंदोरच्या पत्रकार सन्मानाने महाराष्ट्राला प्रेरणा

### बाळशास्त्री जांभेकर यांच्या नावाची मागणी वायरल

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १४ :** महाराष्ट्रात रस्ते, पूल आणि चौकांना राजकीय नेत्यांची किंवा त्यांच्या पूर्वजांची नावे देण्याची प्रथा आहे, तर साहित्यिक, विचारवंत, पत्रकार आणि कलावंतांची नावे दुर्लक्षित राहतात.

मुंबई-पुणे द्रुतगती मागार्ला ज्येष्ठ साहित्यिक पु. ल. देशपांडे यांचे नाव देण्याची मागणी फेटाळली गेली. तसेच, मुंबई-गोवा महामागार्ला आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव देण्याची पत्रकारांची मागणी सरकारकडून प्रतिसाद न मिळाल्याने उपेक्षित आहे.




या पार्श्वभूमीवर, इंदोर महापालिकेने एका मुख्य चौकाला पत्रकाराचे नाव देऊन सन्मान केल्याने कौतुकाचा सूर उमटला आहे. यासंदभार्तील अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांची सोशल मीडिया पोस्ट वायरल झाली आहे.

इंदोरच्या या निर्णयाने पत्रकारांचा सन्मान तर केलाच, पण महाराष्ट्राला दिशा दाखवली. बाळशास्त्री जांभेकर यांनी १८३२ मध्ये दर्पण वृत्तपत्र सुरू करून पत्रकारितेचा पाया घातला. त्यांचे नाव मुंबई-गोवा महामार्गाला द्यावे, असे देशमुख यांनी म्हटले आहे. त्यांनी शिकारे बाबा, जरा शेजाऱ्याकडून शिका,असा टोला लगावत सरकारला साहित्यिक आणि पत्रकारांचा सन्मान करण्याचे आवाहन केले.

या पोस्टला सामाजिक माध्यमांवर मोठा पाठिंबा मिळाला असून, पत्रकार आणि साहित्यप्रेमींनी इंदोरच्या पावलावरून महाराष्ट्राने प्रेरणा घ्यावी, अशी मागणी केली आहे. राजकीय नेत्यांच्या नावांऐवजी सांस्कृतिक योगदान देणाऱ्यांचा सन्मान व्हायला हवा, अशी भावना व्यक्त होत आहे. या चचेर्मुळे जांभेकर यांच्या नावाची मागणी पुन्हा तीव्र झाली आहे. सरकार यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महासागर ●मंगळवार,दि.१५ एप्रिल २०२५

# अकोला

पान 3

## जिल्हाधिकारी कार्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**अकोला :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयातील लोकशाही सभागृहात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील,उपजिल्हाधिकारी महेश परांडेकर, अधीक्षक शाम धनमाने यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागाच्या कर्मचाऱ्यांनीही पुष्प अर्पण करून अभिवादन केले.





# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना कोटी कोटी वंदन!

## कलाध्यापक संघाचे भव्य रांगोळीतून महामानवाला अभिवादन







**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी)**

कलाध्यापक संघाच्या वतीने जुन्या बसस्थानकाच्या आवारात डॉ. बाबासाहेब आंबेडकर १८ हजार चौरस फूट भव्य रांगोळी काढून महामानवाला अभिवादन केले. सुमारे ५० पुरुष आणि महिला उपक्रमात सहभागी होत्या. संघाच्या पदाधिका–यांनी या संदर्भात काँग्रेस अनुसूचित जाती आघाडीचे महेंद्र गवई यांच्याशी संपर्क साधला. आमदार साजीदखान पठाण आणि पदाधिकारी यांना उपक्रमाची माहिती दिली. आपण उपक्रमाची जबाबदारी उचलली. रांगोळी रेखाटायला ४० तास आणि ३८०० किलो रांगोळी लागली. आणि रांगोळी तयार झाल्याचा आनंद सांगताना महेंद्र गवई यांना गहिवरून आले. हा विश्व विक्रम होऊ शकतो असा विश्वास व्यक्त केला जातो आहे. या बाबत गिनीज बुक, इंडिया बुक ऑफ़ वर्ल्ड रेकॉर्ड, लिम्का बुक ऑफ़ वर्ल्ड रेकॉर्ड कडे नोंद केली आहे असे गवई यांनी आर आर सी नेटवर्कशी संवाद पान २ वर

साधताना सांगितले. या भव्य दिव्य उपक्रमात अकोला जिल्हा कलाध्यापक संघाचे राज्य प्रसिद्धी प्रमुख संजय आगाशे, जिल्हाध्यक्ष संदीप शेवलकर, सचिव चंद्रकांत वाघ, माजी कार्यवाह अमरावती विभाग सुभाष धार्मिक, संजय गोपनारायण, हेमंत उपरीकर, संतोष सहारे, विवेक फ़ोकमारे, मंगेश श्रीवास, आनंदा फ़ुलारी, दीपक भुसारी, दिनेश पाटील, तायडे, रवी मुळे, योगेश कड, रवींद्र पांडे, भाऊलाल देवतवाल, उमेश जोशी, विठ्ठलईडोळे, गणेश ठाकरे, रविंद्र काळपांडे,अनिलभगत, रविंद्र दिवटे, राजेश्वर टाले, सुनील देशमुख, गणेश खान्झोडे, गणेश ठाकरे, प्रतिक वाघ, अर्चना बरोकार, मेघमाला काठोके, रूपाली कुलकर्णी आणि सहकारी यांचा समावेश होता.

## शहर कांग्रेस तर्फे आंबेडकर जयंती साजरी



**▪पातुर,दि १४ (प्रतिनिधी):**

भारत रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती बुद्ध विहार मिलींद नगर येथे साजरी करणयात आली या वेली कांग्रेस नेते हाजी सै कमरोद्दीन यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनविष्य मनोगत व्यक्त केले सदर कार्यक्रमला शहर कांग्रेस कमेटी चे अध्यक्ष मुख्तार शेख अहमद उधोजक प्रकाश भाऊ निमकंडे, सैय्यद गनी,देवमन खंडारे, मधुकर इंगले, चंद्रकांत बारतशे, माजी सैनीक गवई साहेब, राहुल वानखेडे,सह कार्यक्रते पदाधिकारी उपस्थित होते.

## अभ्यासपूरक साहित्य वाटप करुन डॉ.आंबेडकरांना अभिवादन

**▪हिवरखेड,दि ११ (प्रतिनिधी) :**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त हिवरखेड येथील विश्वशांती बुद्ध विहार, मिलिंद बुद्ध विहार व द. टारगेट अकॅड मीला अभ्यासपूरक साहित्य वाटप करून हिवरखेडचे माजी उपसरपंच रमेश दुतोंडे यांनी महामानव, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आगळ्यावेगळ्या प्रकारे अभिवादन केले आहे. डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाला फार महत्व दिले होते. शिका, संघटित व्हा व संघर्ष करा ही त्यांची शिकवण होती. त्याला अनुसरून हिवरखेड येथील गरीब–होतकरू विध्यार्थ्यांना अभ्यास करता यावा या उद्देशाने रमेश दुतोंडे यांनी हिवरखेड येथील विश्वशांती बुद्ध विहार, आनंद बुद्ध विहार व प्रा. गौतम इंगळे सरांच्या द टारगेट अकॅडमीला प्रत्येकी १० खुर्च्या, कपाट, टेबल, पंखा व ट्यूबलाईट वितरण केले. त्यांच्या या उपक्रमा मुळे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विध्यार्थ्यांची फार मोठी समस्या सुटली आहे. यापूर्वी सुद्धा रमेश दुतोंडे व सौ. सुलभाताई रमेश दुतोंडे यांनी गावातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विध्यार्थ्यांसाठी महात्मा फुले सार्वजनिक वाचनालयाला जवळपास साथ हजार रुपयांची पुस्तके दिली होती. त्यांच्या या उपक्रमाचे सगळीकडे कौतुक होत आहे.

यावेळी माजी सरपंच संदिप इंगळे, लोकजागर मंचचे महेंद्र कराळे, गणेश वानखडे, रविंद्र वाकोडे, संजय हिवराळे, सुदाम राऊत,प्रा. गौतम इंगळे, रुपेश भरक्षे, दिपक रायबोले इत्यादी उपस्थित होते.



## माँ जिजाऊ सार्वजनिक वाचनालयात आंबेडकर उत्साहात!



**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी)**

माँ जिजाऊ सार्वजनिक वाचनालय, न्यु महसुल कॉलनी खडकी बु. अकोला येथे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त तहसीलदार आत्माराम तेलगोटे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून पुरस्कार प्राप्त चक्रे सर होते. कार्यक्रमाला भगवान झिने, रत्नाकर भुजाडे, किसन शेगोकार, दिनेश सोनोने, मनोरमा तेलगोटे, मनुताई बदरखे, रेखा झिने, विद्या अंभोरे, आत्माराम तेलगोटे, ओरा चके, मनिषा भुजाडे, मिनाक्षी शेगोकार, सुरेखा सोनोने, सुवर्णा ठाकरे, जया झिने, कांता घोडे, ईश्वरी शेगोकार, समृद्धी,सार्थक, रोशन आदि उपस्थित होते.

## लाखपुरी येथील जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक केंद्र शाळेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिनव उपक्रम विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**▪लाखपुरी,दि १४ (प्रतिनिधी):**

मुर्तिजापूर तालुक्यातील लाखपुरी येथे जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा लाखपुरी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. सर्वप्रथम महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन हारअर्पण मान्यवरांच्या वतीने व उपस्थिताच्या वतिने करण्यात आले .लाखपुरी येथील दैनिक भास्कर चे पत्रकार गजानन गवई यांच्या वाढदिवस व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त हा कार्यक्रम जिल्हा परिषद शाळेत आयोजित करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गजानन गवई हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून मुख्याध्यापक राहुल तिडके सर , ग्रामीण पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अतुल नवघरे , पत्रकार आकाश जामनिक , प्रविण जामनिक हे होते तर प्रमुख उपस्थितांन मध्ये



सौ. वर्षा बर्डे मॅडम , राजुरकर मॅडम , संगीता विल्हेकर , सचिन जोशी सर , महेंद्र वर्मे सर, व लाखपुरी येथील हर्षल बर्डे यांची उपस्थिती होती. यासह शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते . मान्यवरांमधून गजानन गवई , अतुल नवघरे , आकाश जामनिक , महेंद्र वर्मे सर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी सखोल माहिती विद्यार्थ्यांना सांगितली .व उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व चॉकलेट , पेढे वाटप करण्यात आले. ग्रामीण पत्रकार संघ मुर्तिजापूर तालुक्याच्या वतीने मुर्तीजापुर तालुक्यातील सर्व केंद्र शाळेमधून जिल्हा परिषद केंद्र शाळा लाखपुरी येथील शिक्षीका सौ. वर्षा बर्डे यांना उत्कृष्ट शिक्षिका म्हणून गौरवण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे संचालन महेंद्र वर्मे सरांनी केले.

## वंचितचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे यांचेतर्फे भिमजयंती निमित्ताने वाचनालयांना ग्रंथदान

अकोला भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे यांनी आपले वडिल माजी मुख्याध्यापक स्व. रमेशजी देंडवे यांच्या स्मरणार्थ नालंदा सार्वजनिक वाचनालय देवळी ता . जि. अकोला व छत्रपती शिवाजी महाराज अभयासिका केंद्र दोनवाडा ता . जि. अकोला यांना ग्रथदान केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला वाघीणीचे दुध म्हटले आहे व त्यासाठी वाचनाची गोडी निर्माण होणे गरजेचे आहे. ज्याचे वाचन भव्य असेल तो कुठल्याही संकटाला समोरो जाण्याची क्षमता ठेवतो म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जन्मदिवस म्हणजेच भिमजयंती हि नाचुन नव्हे तर वाचुन साजरी करावी असे वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे यांचे वडिल माजी मुख्याध्यापक स्व. रमेशजी देंडवे आपल्या हयातीत सांगत होते.

त्यांचे ते शब्द प्रत्यक्षात आणावे व भिम जयंती निमित्ताने त्यांच्या विचारांना समर्पित व्हावे म्हणून गाव खेड्यात सुरू असलेल्या वाचनालयांना ग्रंथदान करावे अशी संकल्पना देंडवे परिवाराने केली व ती आज भिम जयंती निमित्ताने प्रत्यक्षात आणली. नालंदा सार्वजनिक वाचनालय देवळीचे सचिव विकास हिम्मतराव सदांशिव व छत्रपती शिवाजी महाराज अभयासिका केंद्र दोनवाडाचे अध्यक्ष शरद विश्वनाथ इंगोले यांना शेकडो पुस्तके गावकऱ्यांना ग्रथदान म्हणून दिली. ह्यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे यांच्यासह जिल्हा महासचिव मिलींद इंगळे, सम्यंक विद्यार्थी आंदोलनचे जिल्हाध्यक्ष धिरज इंगळे, मनापा गटनेते गजानन गवई, अकोला तालुकाध्यक्ष किशोर जामणिक, सुरेश कलोरे, अशोक लोणाग्रे, शिलवंत शिरसाट, मोहन तायडे, रूणसेवक नितीन सपकाळ, डॉ. शंकरराव राजुस्कर आदी मान्यवर उपस्थित होते.



## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सूर्योदय आश्रम येथे फळ वाटप

**▪अकोला,दि १४ (प्रतिनिधी)**

✻✻महामानव भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती व भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांचा वाढदिवस एकच दिवशी येणे हे भाजपा कार्यकर्त्यांसाठी स्वर्ण दिवस असून पेरला आणि ऊर्जा देणारे राष्ट्रपुरुष महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आणि सामाजिक शेतकरी सर्वसामान्यांसाठी घडणारा विदर्भाचा नेता शेतकरी व्यापारी सर्वसामान्यांना उपलब्ध राहणारा १८ तास काम करणारा लोकनेता रणधीर सावरकर स्पष्ट आणि सर्वांचे सुख दुःख समजून घेणार नेतृत्वाचा वाढदिवस हा सामाजिक समरसता चा संगम असल्याची प्रतिपादन खासदार अनुप धोत्रे यांनी सांगितले.

खा अनुप धोत्रे, महानगर अध्यक्ष जयंत मसने,विजय अग्रवाल ,कृष्णा शर्मा,



माधव मानकर, गिरीश जोशी , संजय गोटफ़ोडे,ॲड देवाशिष काकड ,रमेश अलकरी, ॲड सुभाषसिंग ठाकूर , उकंडराव सोनोने, गणेश अंधारे, संदीप गावंडे, संतोष पांडे, राज पलन ,उमेश श्रीवास्तव, प्रकाश घोगलिया, मिलिंद राऊत, योगेश मानकर, विजय इंगळे, संतोष डोंगरे, संदीप शेगोकार, अभिजीत कडू, जस्मितसिंह ओबेराय, शितल जैन, शिवलाल इंगळे, प्रशांत अवचार, वैकुंठ ढोरे, आनंद मनवानी, विकी ठाकूर मंगेश माकोडे,,रवी यादव, जितू देशमुख ,शुभम चंदन, विकल्प नंदेश्वर, राजू वगारे , प्रकाश घोगलिया,धनंजय धाबाले, विपुल घोगरे, किशोर कुचके,पंकज मांगुळकर, नंदू गावारे ,सुरेश भागानगरे, रवी यादव, चंदाताई शर्मा, आम्रपाली उपरवट,जानवी डोंगरे ,आरती घोगलिया,वर्षा गावंडे, अस्मिता वगैरे ,शिल्पा देशमुख. यांच्या उपस्थितीत बारा ज्योतिर्लिंग मंदिरात अभिषेक करण्यात आले तसेच सूर्योदय आश्रमात आश्रमात फळ वाटप करण्यात आले व बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून आमदार सावरकर यांना दीर्घायुष्य लाभो अशी प्रार्थना करण्यात आली त्यांच्या नेतृत्वात विकासाचा पर्व ला गती देण्यात गती प्राप्त व्हावी. सर्वसामान्यांच्या समस्या निराकरण व्हाव्या व विकासाचा सर्व क्षेत्राचा व्हावा अशी प्रार्थना करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन राज पलन यांनी केले.

## ज्ञानेश्वरी बहुउद्देशीय संस्थेतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयतं उत्साहात साजरी

अकोला: भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती ज्ञानेश्वरी बहुउद्देशीय संस्थेमार्फ़त खडकी अकोला येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री श्रावण पाटील व सौ ज्ञानेश्वरी पाटील हे उपस्थित होते.

त्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला त्याचबरोबर यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री पी एस पाटील यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणासाठी जो फार मोठा संघर्ष केलेला आहे त्याचे महत्त्व पटवून दिले व आज जो काही पुरुष आणि महिला



खंबीरपणाने उभे आहे ती डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुण्याईमुळेच त्यांनी शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हामूलमंत्र दिला आणि या मूलमंर्त्यावर आजची तरुण पिढी खूप पुढे जात आहे चांगले शिक्षण घेत आहे म ोठ्या मोठ्या पदावर पोहोचत आहे याचे संपूर्ण श्रेय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना जाते त्याचबरोबर यावेळी संस्थेच्या सचिव कुमारी अश्विनी घुले यांनी सुद्धा मनोगत म धून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल मोलाचे मार्गदर्शन केले यावेळी संस्थेच्या वतीने चहा नाश्ता देण्यात आला.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम बोले फोन ९८८१४८१४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# काँग्रेसचे दिवास्वप्न...

इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे ८४ वे अधिवेशन गुजरातमधील अहमदाबाद येथे ८ आणि ९ एप्रिलला पार पडले. गेली दहा-अकरा वर्षे पराभवाच्या गर्तेत सापडलेल्या काँग्रेसला संजीवनी कशी मिळणार यावर अधिवेशनात चर्चा झाली. मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी आणि अन्य बड्या नेत्यांची भाषणे झाली.

या अधिवेशनाने काय दिले याचा शोध घेतला तर ठोस असे काही सांगता येत नाही. सलग तिसऱ्यांदा लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला पराभव पत्करावा लागला आहे. ज्या राज्यात काँग्रेसचे अ. भा. अधिवेशन झाले, त्या गुजरातमध्ये गेली तीस वर्षे काँग्रेस सत्तेबाहेर आहे.

तब्बल ६४ वर्षांच्या कालावधीनंतर गुजरातमध्ये काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन झाले हेच विशेष म्हणावे लागेल. आगामी गुजरात विधानसभा निवडणुकीत सत्तेवर येण्याची स्वप्ने पाहणाऱ्या काँग्रेसला, सध्याच्या विधानसभेत १८२ पैकी १५६ आमदार भाजपाचे आहेत, याचा विसर पडला असावा.

सन १९६० मध्ये गुजरात राज्याची निर्मिती झाल्यावर १९६१ मध्ये अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन भावनगरमध्ये झाले होते. तेव्हा पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, मोरारजी देसाई, उच्छंगराय ढेबर यांच्या उपस्थितीत ते पार पडले.

१९६१ मध्ये झालेल्या काँग्रेसच्या ६६ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष नीलम संजीव रेड्डी होते. स्वागताध्यक्ष ठाकोरभाई देसाई होते. सरचिटणीस जी. राजगोपालन, सादिक अली व कोषाध्यक्ष महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण उपस्थित होते.

भावनगर येथे पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन व्हावे यासाठी बलवंतराय मेहता हे स्वतः आग्रही होते. तेव्हा पंडित नेहरूंची लोकप्रियता उत्तुंग होती. चाचा नेहरूंना पाहण्यासाठी हजारो लोक भावनगरला आले होते. भावनगरच्या अधिवेशनात काँग्रेसने राष्ट्रीय एकात्मता समिती स्थापन केल्याचे जाहीर केले व समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी इंदिरा गांधींकडे सोपविण्यात आली.

तेव्हा नीलम संजीव रेड्डी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले होते, काँग्रेस पक्षात शिस्त राखली पाहिजे. पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये ध्येयाची भावना जोपासली पाहिजे. पुढील वर्षी (१९६२) निवडणुका होतील, आपण का उभे आहोत, आपण निवडणुका कशासाठी लढवत आहोत, हे लोकांना सहजपणे समजवता आले पाहिजे.

जे ६४ वर्षांपूर्वी अध्यक्षपदावरून भाषण करताना नीलम संजीव रेड्डी यांनी सांगितले, तेच बोल काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना अहमदाबादमधील अधिवेशनात सांगण्याची पाळी आली. स्वातंत्र्यांपासून देशाची व बहुतेक सर्व राज्यांची सत्ता वर्षानुवर्षे काँग्रेस पक्षाकडेच होती. काँग्रेसला आव्हान देईल असा राष्ट्रीय पातळीवर खंबीर व भक्कम पर्याय या काळात उभा राहू शकला नाही.

नरेंद्र मोदींचा राष्ट्रीय क्षितीजावर उदय झाल्यापासून म्हणजे सन २०१३ पासून काँग्रेसची घसरण सुरू झाली. गेले तीन टर्म काँग्रेस केंद्रात सत्तेवर नाही. त्यातली दोन टर्म म्हणजे २०१४ ते २०२४ काँग्रेसला लोकसभेत पुरेसे संख्याबळ नसल्याने विरोधी पक्ष नेतेपदही मिळवता आले नाही.

गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे १०० खासदार निवडून आल्याने दहा वर्षांच्या पोकळीनंतर काँग्रेसच्या वाट्याला विरोधी पक्ष नेतेपद आले. लोकसभा व राज्यसभा या संसदेतील दोन्ही सदनातील विरोधी पक्ष नेतेपद काँग्रेसकडे आहे. तरीही काँग्रेसला निवडणुकीच्या राजकारणात पाठोपाठ अपयश का येत आहे?

अहमदाबादच्या काँग्रेस अधिवेशनात व्यासपीठावर मल्लिकार्जुन खरगे, सोनिया गांधी, राहुल गांधी असे हायकमांड उपस्थित असताना त्यांच्यासमोर देशातील काही पदाधिकाऱ्यांनी विशेषतः महिलांनी सडेतोड भूमिका मांडून पक्षाला वारंवार येत असलेल्या अपयशाला पक्षाचेच काही नेते जबाबदार असल्याचे ठणकावून सांगितले.

राहुल गांधी यांनी कन्याकुमारी ते काश्मीर व मणिपूर ते मुंबई अशा दोन पदयात्रा काढून सर्व देशाचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्याबरोबर हजारो लोक चालत होते. त्यांचे सर्वत्र जोरदार स्वागत होताना दिसले.

मग काँग्रेसला लोकसभा, विधानसभा निवडणुकांमध्ये यश का लाभले नाही? पक्षाचे सर्वोच्च नेतृत्व पक्षासाठी मेहनत घेतात, निवडणूक काळात अहोरात्र प्रयत्न करतात पण पक्षातील काही गद्दार पक्षाचा पराभव कसा होईल असे वागतात असेही आरोप अधिवेशनात केले गेले.

राहुल गांधी हेच काँग्रेस कार्यकर्त्यांना एकमेव आशास्थान वाटते. ते पक्षात कार्यरत किंवा सक्रिय असतात तेव्हा पक्षात थोडी जान येते पण मधेच ते गायब होतात, कुठे तरी सुट्टीवर किंवा विदेशात निघून जातात, मग भरंवसा कोणावर ठेवायचा? असा प्रश्न कार्यकर्ते विचारतात.

कार्यकर्त्यांना ऊर्जा देईल, राज्या-राज्यात कार्यकर्ते सक्रिय राहतील असे देशपातळीवर व राज्य पातळीवर नेतृत्व काँग्रेसकडे नाही. तरुणाईला काँग्रेसकडे आकर्षित करील असा पक्षाकडे नेता नाही. मग पक्ष कसा वाढणार?

काँग्रेस जिल्हाध्यक्षांचा एक मुलगा भाजपामध्ये व दुसरा प्रादेशिक पक्षात असेल तर त्या जिल्हाध्यक्षांवर विश्वास कोण ठेवणार? प्रदेशाध्यक्ष, जिल्हाध्यक्ष किंवा शहराध्यक्षांनी निवडणूक लढवता कामा नये, असा दंडक पक्षाने घातला पाहिजे.

शा पदांवर बसलेले नेते पक्षाची उमेदवारी मिळवतात व स्वतः लढतात, त्यामुळे पक्षाच्या अन्य उमेदवारांच्या प्रचाराकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ मिळत नाही. प्रदेशाध्यक्ष किंवा जिल्हा अध्यक्ष स्वतःच्या मतदारसंघात अडकून बसले तर पक्षाचे अन्य उमेदवार कसे निवडून येतील? त्यांना निवडणुकीची रसद कोण पुरवील?

अहमदाबाद येथे झालेल्या अधिवेशनात राहुल गांधी यांचे जे भाषण झाले त्यात तेच तेच मुद्दे होते. संसदेत झालेल्या वक्फ विधेयकावरील चर्चेत त्यांनी भागच घेतला नाही. जर संवेदनशील विषयावर विरोधी पक्ष नेताच बोलणार नसेल तर विरोधी बाकांवरील सदस्यांमध्ये काय संदेश जाणार? या विषयावर चर्चा होत असताना प्रियंका गांधी वड्रा या संसदेत फिरकल्याही नाहीत मग पक्षाने काय बोध घ्यायचा?

काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनात लोकसभा, तसेच दिल्ली, महाराष्ट्र, हरियाणा विधानसभा निवडणुकीतील पराभवाचे आत्मचिंतन होईल असे वाटले होते, पण तसे घडले नाही.

आपण कुठे नेमके कमी पडतोय हे कुणी सांगितले नाही. राहुल गांधींचे भाषण म्हणजे तेच तेच सांगत असतात. त्यांच्या प्रत्येक भाषणात राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका असते. भाजपा व संघाला केवळ काँग्रेसच रोखू शकते असे ते सांगतात मग गेली अकरा वर्षे प्रत्येक निवडणुकीत काँग्रेस पक्ष सपाटून मार का खात आहे?

पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी, तामिळनाडूमध्ये एम. के. स्टॅलिन, उत्तर प्रदेशात अखिलेश यादव, जम्मू-काश्मीरमध्ये ओमर अब्दुल्ला यांनी भाजपापुढे आव्हान उभे केले तसे काँग्रेसला कोणत्या राज्यात भाजपाला नमवता आले? आंध्र प्रदेशात चंद्राबाबू नायडू व बिहारमध्ये नितीश कुमार यांना बरोबर घेणे भाजपाला भाग पडते पण त्या राज्यातही काँग्रेसला तिसऱ्या-चौथ्या क्रमांकावर आहे.

बांगला देशाचे राष्ट्रपती उलट उत्तर देतात आणि त्यांच्यासोबत बसलेले मोदीजी गप्प बसतात, अशी बालिश टीका करणे मुळात औचित्याला धरून नाही. आपले पंतप्रधान थेट झुकतात असे बोलणे, राहुल यांना शोभले नाही.

रामलीला मैदानावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने राज्य घटना जाळली किंवा महाराष्ट्र विधानसभा निवडणूक म्हणजे मोठा घोटाळा, असे आरोप राहुल करतात पण त्याला देशात कुठेच प्रतिसाद मिळत नाही, मग वारंवार तेच तेच बोलून काय साध्य करतात? भाजपा, संघ व सावरकर हे राहुल यांचे टीका करण्याचे आवडीचे विषय आहेत पण त्याचा लाभ पक्षाला निवडणुकीत मिळत नाही.

वारंवार येणाऱ्या अपयशाने मल्लिकार्जुन खरगे अस्वस्थ आहेत. पराजयाची मालिका संपत नाही आणि कोंडी फुटत नाही. भाजपासारखे निवडणूक व्यवस्थापन, कार्यकर्त्यांची संघटित फौज, संघाची निष्ठावान केडर आणि मोदी- शहांसारखे दणकट नेतृत्व काँग्रेसकडे नाही.

काँग्रेस पक्ष कमकुवत व्हावा म्हणून पक्षाचे ताकदवान नेते भाजपा खेचून घेत आहे, असे म्हणणे म्हणजे आपले पक्षावर नियंत्रण राहिलेले नाही, हे मान्य करण्यासारखे आहे. ज्यांना काम करायचे नाही त्यांनी घरी बसावे असा इशारा खरगे यांनी अधिवेशनात दिला आहे.

निवडणूक काळात भाजपाप्रमाणे मतदार यादीसाठी पन्ना प्रमुख नेमण्याचे काँग्रेस योजत आहे. यापुढे एक कुटुंब एकच उमेदवारी मिळेल. पाच वर्षांपेक्षा जास्त काळ पद मिळणार नाही, ५० टक्के पदे ५० वर्षांखालील वयाच्या कार्यकर्त्यांना मिळतील असे खरगे यांनी जाहीर केले. काँग्रेस कमकुवक राहावी हीच भाजपाची रणनिती आहे असे खरगे सांगतात. मग काँग्रेस शक्तिशाली यासाठी भाजपाचे काम करावे असे त्यांना वाटते काय?

पोलादी पुरुष म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सरदार वल्लभभाई पटेल यांचा मोदींनी गुजरातमध्ये उत्तुंग पुतळा उभारून सात वर्षे झाली, आज काँग्रेसला वल्लभभाई पटेल हे आमचे नेते आहेत, असे सांगण्याची पाळी आली. कर्नाटक, तेलंगणा आणि हिमाचल प्रदेश या तीनच राज्यांत काँग्रेसचे सरकार आहे. पण मोदी-शहांच्या गुजरातमध्ये सत्तेवर येण्याचे स्वप्न पाहणे म्हणजे काँग्रेसचे दिवास्वप्न आहे.

■ ■ ■

# आधुनिक भारताचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर

स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजनीतिज्ञ, तत्त्वज्ञ, समाजसुधारक, पत्रकार, वकील, दलित बौद्ध चळवळीचे प्रेरणास्थान आणि भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची काल संपूर्ण विश्वात जयंती साजरी झाली.

प्रचंड बुद्धिमत्ता, समाजासाठी असीम त्याग करणारे, दलित समाजाला हक्क मिळवून देणारे, महाडचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन, मंदिर सत्याग्रह, शेतक?यांचा कैवारी, गोलमेज परिषद, पुणे करार, स्वतंत्र मजूर पक्ष, बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना, दलित शिक्षण संस्थेची स्थापना, पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना, महिलांसाठी कार्य, स्वातंत्र्य लढ्यात सहभाग अशा कितीतरी गोष्टी बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनात केल्या.

समाजासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. समाजामधील तळागाळातील व्यक्तींचा प्रामुख्याने विचार केला. शिक्षणासाठी, समाजाच्या कल्याणासाठी आयुष्यभर संघर्ष केला. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, असा गुरुमंत्र दिला. असामान्य कर्तृत्व गाजवणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला जोड नाही.

### प्रारंभीचा काळ

मध्य प्रदेशातील महू येथे बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला. बाबासाहेबांच्या वडिलांचे नाव रामजी आणि आईचे नाव भीमाबाई असे होते. मध्य प्रदेशानंतर काही काळ दापोली, सातारा असे वास्तव्य करीत आंबेडकरांचे कुटुंब मुंबईत राहण्यास आले. बाबासाहेबांनी सुरुवातीचे शिक्षण मुंबईतील सरकारी शाळेत घेतले. बाबासाहेबांनी शिक्षण घेण्यासाठी खूप कष्ट सोसले. वयाच्या १४-१५ वर्षी बाबासाहेब आंबेडकर यांचा विवाह दापोली येथील भिकू वलंगकर यांच्या मुलीशी म्हणजेच रमाबाई यांच्याशी झाला. बाबासाहेब आपल्या शालेय जीवनात १८ तास अभ्यास करत असत.

### उच्च शिक्षण

मॅट्रिकची परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण झाल्यानंतर बाबासाहेबांनी मुंबई विद्यापीठातून बी.ए. ची पदवी घेतली. बडोदा संस्थानाचे सयाजीराव गायकवाड यांच्या मदतीने बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत गेले. कोलंबिया विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयाद एम.ए.ची पदवी संपादन केली. त्यानंतर याच विषयात डॉक्टरेट मिळवली.

परदेशातील विद्यापीठातून अर्थशास्त्रात पदवी संपादन करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पहिले भारतीय होते. बाबासाहेबांनी दोन विषयात एम.ए. केले. दोन विषयात पीएच.डी. मिळवली. बार-ॲट-लॉ आणि डी. एससी पदवी घेतली. ग्रेज इन येथून बॅरिस्टर-ॲट-लॉ ही पदवी घेऊन ३ एप्रिल १९२३ रोजी मुंबईत परतले.

समाजकार्य करावे व अर्थार्जनासाठी वकिली करावी असा निर्णय त्यांनी घेतला. सुरुवातीच्या काळात बाबासाहेबांनी उत्तम प्रकारे वकिली केली.

### सत्याग्रह

१९२० मध्ये बाबासाहेबांनी मूकनायक नावाचे वृत्तपत्र सुरू केले. संपूर्ण देशात बहुसंख्य ठिकाणी अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याचा किंवा पिण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळेच अस्पृश्यांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी बाबासाहेबांनी महाड येथे पिण्याच्या पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरवले.

बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९२४ रोजी मुंबई येथे 'बहिष्कृत हितकारिणी सभे'ची स्थापना केली. सामाजिक व राजकीयदृष्ट्या तळागाळात फेकल्या गेलेल्यांना भारतीय समाजातील इतरांच्या बरोबर आणणे, हे ह्या सभेचे ध्येय होते. हिंदू असूनही हिंदूच्या मंदिरात प्रवेश मिळत नसल्यामुळे तो समानतेचा अधिकार मिळवण्यासाठी अमरावती येथील प्राचीन अंबाबाई मंदिरात, पुण्यातील पर्वती मंदिरात, नाशिक येथील काळाराम मंदिरात बाबासाहेबांनी मंदिर सत्याग्रह केला.

### शेतकऱ्यांसाठी कार्य

शेतीला उद्योग मानून पायाभूत सुविधा पुरवून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे. आर्थिक स्त्रोत तळागाळापर्यंत झिरपले म्हणजे ग्रामीण माणसाच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडतील. आर्थिक विषमता जितकी कमी होईल, तितकी जातीय भेदभावाची दरी कमी होईल, असे बाबासाहेबांना वाटत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वात महत्त्वाची संकल्पना मांडली ती 'शेतीचे राष्ट्रीयकरण' करण्याची. पीकपद्धती, पाणी उपलब्धता, बांधबंदिस्ती, उत्पादकता वाढ, साठवण व्यवस्था, शेतमालाची विक्री, शेतमालाचे भाव या संदर्भात स्पष्ट नियम करावेत, असे त्यांचे स्पष्ट मत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काही संकल्पनातूनच कमाल जमीनधारणा कायदा, सावकारी व खोती पद्धतींना प्रतिबंध करणारा कायदा, सामूहिक शेतीचे प्रणालीवर आधारित शेती महामंडळ, राज्यातील नद्यांच्या खोऱ्यांची विभागणी व विकास, जलसंवर्धन योजना अमलात आल्या. शासनाने त्याबाबत कायदे व नियम बनविले. यामागे डॉ. बाबासाहेब यांच्या विचारांचाच प्रभाव दिसून येतो.

### असामान्य कर्तृत्व

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समग्र पीडित, शोषित व दलितांचे प्रतिनिधी म्हणून लंडनच्या तिन्हींही गोलमेज परिषदांचा हजर राहिले. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत अस्पृश्यांचे हितसंरक्षण करण्याच्या हेतूने त्यांनी इंडियन राऊंटेबल कॉन्फरन्सला मागण्या सादर केल्या.

१९२० च्या दशकाच्या अखेरीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितांचे राजकीय नेते बनले होते. इ.स. १९३२ रोजी ब्रिटिश मंत्रिमंडळाने पुणे करार मंजूर करून घेतला. त्यावर मंत्रिमंडळाने शिक्कामोर्तब केले. मजुरांना, कामगारांना हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी इ.स. १९३६ मध्ये त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना, दलित शिक्षणसंस्थेची स्थापना, पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून शिक्षणाची दारे खुली केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचे पक्के समर्थक होते. त्यांच्यावर तथागत गौतम बुद्धांच्या शिकवणुकीचा आणि महात्मा जोतिबा फुलेंच्या कायार्चा प्रभाव होता. ते स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते होते.

स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री असलेल्या बाबासाहेब आंबेडकरांचा भारतीय संविधानात सिंहाचा वाटा होता. एवढे सूक्ष्म निरीक्षण असणारे आणि कोणावरही अन्याय न करता सर्वांना समान हक्क, अधिकार देणाऱ्या बाबासाहेबांच्या असामान्य बुद्धीची प्रचिती संविधानाच्या वाचनावरून, तरतुदींवरून येतेच.

### धर्मांतराची घोषणा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कोट्यवधी दलितांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी दिवसरात्र झटत होते. हिंदू धर्मात आपल्याला समतेची वागणूक देण्यात यावी यासाठी त्यांनी मोठा लढा दिला. शेवटी हिंदू धर्म त्यागाचा म्हणजेच धर्मांतराचा निर्णय घेतला.

हिंदू धर्माचा त्याग केल्यानंतर कोणत्या धर्माचा स्वीकार करायचा, याबद्दल बाबासाहेबांनी सखोल विचार केला. हजारो कार्यकर्ते आणि अनुयायांचा बाबासाहेबांना पाठिंबा होता. अखेर बौद्ध धर्माचा बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली २ मे १९५० रोजी भारतात पहिली सार्वजनिक बुद्ध जयंती दिल्ली येथे साजरी झाली. या जयंती समारोहास अनेक देशांचे वकील/प्रतिनिधी, भिक्खू समुदाय व सुमारे वीस हजार लोकांचा समुदायही उपस्थित होता.


मार्च १९५९ च्या एका अहवालानुसार देशात १.५ ते २ कोटी अस्पृश्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला होता. या घटनेची जागतिक इतिहासात नोंद झाली तर या घटनेने भारतात बौद्ध धर्म पुनर्जीवित झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर जगात ऐतिहासिक होते. कारण ते जगातील सर्वात मोठे सामूहिक धर्मांतर होते.

### महापरिनिर्वाण

नागपूर व चंद्रपूर येथील धर्मांतराचे कार्यक्रम उरकून आणि आता धम्मचक्र पुन्हा एकदा गतिमान झालेले पाहून बाबासाहेब आंबेडकर दिल्लीला परतले. २० नोव्हेंबर १९५६ मध्ये ते नेपाळमधील काठमांडूला 'वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट'च्या चौथ्या परिषदेस हजर राहिले.

आपल्या परतीच्या प्रवासात त्यांनी बनारसमध्ये दोन भाषणे दिली. दिल्लीमध्येही त्यांनी विविध बौद्ध समारंभात भाग घेतला. राज्यसभेच्या अधिवेशनात सहभागी झाले आणि आपल्या 'भगवान बुद्ध आणि कार्ल मार्क्स' या पुस्तकाचे शेवटचे प्रकरण लिहून पूर्ण केले. ६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्लीला निवासस्थानी त्यांचे महापरिनिर्वाण झाले.

■ ■ ■



के. पी. खांडेभराड
सेवानिवृत्त मुख्याध्यापक
देऊळगाव राजा.

## संविधान!!

समानतेचा मंत्र दिला
जगण्याची नवी आस
प्रत्येक स्त्रीच्या हृदयात
पेटविला नवीन श्वास

नारी शक्तीचा आधार
हक्काचा केला निर्धार
दलित शोषित नारी तू होती
अज्ञानाच्या अंधारी उभी होती
पुरुष सत्ताक जगात
स्वप्न तुझे धुळीत मिळवले
अंधार युगात भाग्य त्यांचे उजळविले

मतदानाचा अधिकार
संपत्तीतही वाटा दिला
पुरुषप्रधान संस्कृतीत
गौरव झाला
शिक्षणाचा हक्क दिला तुला
घे उंच भरारी आकाशाला

आत्मनिर्भरतीची तू
जगण्याची तू अधिकारणी
कष्टकरी नारी तू सावित्री
घरात आणि शेतात राबले
त्या श्रमाचे मोल कळाले
समान वेतनाचे हक्क मिळाले

अन्यायाविरुद्ध लढण्याची
शक्ती दिली
आत्मविश्वासाची
मशाल पेटवली
हे संविधान केवळ कागद नाही
क्रांतीची मशाल आहे
प्रत्येक हिंदू भगिनींसाठी
हक्काची ही ढाल आहे

डॉक्टर बाबासाहेबांचे
हे उपकार कधीही
न विसरणार नारी
त्यांच्या विचारांचा वसा
घेऊन आकाशी
घेई भरारी
*****
संज्योती

# मराठी गझलचे अनभिषिक्त सम्राट कवि सुरेश भट!

माणूस सहवासातूनच माणूस बनतो. कधी-कधी तर छोटीशी भेट देखील जीवनाचं आयामच बदलून टाकते. माणूस मरतो परंतू त्यांचे विचार मरत नसतात, ते त्यांच्या कार्यशैलीमुळे जीवित असतात. हे अधोरेखित सत्य आहे.

वरपांगी अत्यंत अस्ताव्यस्त दिसणारा हा कवी, त्यांची ती कविता आणि त्यांचे ते गाणे हे तिन्ही घटक त्या कवितेच्या संपूर्ण आस्वादाला आवश्यक असावेत असे वाटायला लागते.हे एक विलक्षण अद्वैत मिश्रण आहे. त्यांची कविता ऐकताना किंवा वाचताना सुरेश भट नावाचा एक मस्त कलंदर माणूस निराळा काढता येत नाही.



माझ्या सुदैवाने सुरेश भटांसारख्या सिध्दहस्त प्रतिभावंत कविचा स्नेह मला लाभला.त्यांचा तो बेडरपणा, दिलदारपणा, हळवेपणा, लोभसवाणा होता, कारण कविते-इतकेच त्यांचे कविता ऐकणाऱ्यावर, जीवनातल्या व्यवहारी धडपडीपलीकडे काही पाहू इच्छिणाऱ्यांवर, ते जाणून घेण्याची तळमळ असणाऱ्यांवर, माणसांच्या चांगुलपणावर प्रेम होते.

साधीसुधी ही माणसे माझ्या कवित्वाची धनी, असे ते केवळ उपचार म्हणून म्हणत नाहीत. त्या साध्यासुध्या माणसांशी साधायच्या संवादाचे त्यांना मोल मोठे वाटायचे. ओळखण्याची त्यांची हातोटी वेगळीच होती. सान असो वा मोठा सगळे सारखेच, त्यांच्या प्रेमात फारकत नव्हती. तेव्हा त्यांनी साप्ताहिक बहूमत नावाचे वर्तमानपत्र सुरु केले. त्यात माझा, जैमिनी कडु यांचा सहकारी म्हणून समावेश होता.

कविला माणसेच कवी म्हणून जगवतात व शिल्लक ठेवतात. कवी हा लिहिणारा माणूस असतो आणि बहुधा जीवन असे असते की ते कविला मनाप्रमाणे लिहू ही देत नाही अन् जगूही देत नाही. या जगात असच चालतं. कवितेच्या प्रांतात गझल सम्राट म्हणून कवी सुरेश भटांना असली आपुलकी लाभली, म्हणूनच तर नेहमी माणसांचा गोतावळा त्यांच्या अवतीभवती असायचा, त्यात मी सुध्दा सामील होतो.

***सजीव जो वरी लता देती***
***मरणा घेती खांद्यावरती...***

जीवन असतांना किंमत नसते, मरणानंतर त्याची महती कळते. अशा या थोर कवीचं नागपूर नगरीच्या महानगरपालिकेने त्यांचं स्मारक म्हणून कविवर्य सुरेश भट सभागृह बांधुन औचित्य साधलं. परंतू शासनाकडून एखादा सत्कार किंवा डॉक्टरेट वगैरे काहीही मिळाले नाही, त्याबद्दल अत्यंत वाईट वाटते. खरच ही शोकांतिका आहे. कवि सुरेश भटांची अनेक गीते चित्रपटासाठी आणि चित्रपटांशिवाय ध्वनिमुद्रित झालेली आहेत, त्यांच्या शब्दांना सुरसम्राज्ञी लता मंगेशकर, आशा भोसले, सुमन कल्याणपूर, देवकी पंडित, सुरेश वाडकर, अरुण दाते आणि नामवंत गायक-गायिकांचा सुरेख कंठ लाभलेला असून हृदयनाथ मंगेशकर, सी. रामचंद्र व बऱ्याच संगीतकारांचे त्यांच्या गीतांना संगीत लाभलेले आहे.

त्यामुळे त्यांच्या अनेक अविस्मरणीय रचना आजही अजरामर झालेल्या आहेत. ते हयात नसले तरी त्यांनी वेळोवेळी केलेले प्रामाणिक प्रयत्न कधीही विसरता येणे शक्य नाही. कविवर्य सुरेश भटांचे ऋण कधीच फिटणार नाहीत. तेव्हा त्यांच्या ऋणांच्या ओज्यात राहायला मला आवडेल! कविश्रेष्ठ सुरेश भटांच्या ९३ व्या वाढदिनानिमित्त त्यांच्या चिरंजीव स्मृतींना मानाचा मुजरा!!

***पटले न जगाशी माझे***
***साऱ्यांना नडलो आहे***
***मजलाच अचंबा वाटे***
***मी कैसे घडलो आहे...***

■ ■ ■



प्रभाकर सोमकुवर
नागपूर
9595255952

# आल्याचे सेवन आणि आरोग्याला चमत्कारी फायदे

निरोगी आरोग्यासाठी आहारामध्ये पोषक तत्वांचा समावेश करण्याची गरज असते. आहारामध्ये जंकफूडचा जास्त प्रमाणात समावेश केल्यामुळे आरोग्यावर गंभी परिणाम होतात.

निरोगी राहाण्यासाठी स्वयंपाकघरातील आल्याचा वापर करतात. आल्याचा वापर प्रत्येक भारतीय स्वयंपाकघरात केला जातो. चहामध्ये वापरण्यापासून ते अन्नाची चव वाढवण्यापर्यंत, ते अन्नाची चव सुधारण्यास देखील मदत करते. आल्यामध्ये जिंजेरॉल, शोगाओल्स आणि पॅराडोल्स सारखे जैविकदृष्ट्या सक्रिय संयुगे असतात जे त्यांच्या अँटिऑक्सिडंट, दाहक-विरोधी आणि जीवाणूविरोधी गुणधर्मासाठी ओळखले जातात.





आरोग्य तज्ञांच्या मते, आल्याचे सेवन केल्याने एक-दोन नव्हे तर अनेक फायदे मिळू शकतात. येथे आम्ही तुम्हाला आले खाण्याचे फायदे सांगत आहोत. जर आले पाण्यात उकळून त्याचा चहा दैनंदिनरित्या प्याला तर अनेक समस्यांपासून आराम मिळू शकतो. पण त्यात दूध आणि साखर घालण्याची गरज नाही, हवे असल्यास या चहामध्ये मध घालू शकता.

आल्याचा चहा पचनसंस्था मजबूत करण्यास मदत करतो आणि पचनाच्या समस्या देखील दूर ठेवतो. आले पाचक एंजाइम्सना उत्तेजित करून, पोटाचे कार्य सुधारून आणि पोटफुगी कमी करून पचनास मदत करते. अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध असलेले आले अँटीबॅक्टेरियल गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. आले रंग सुधारण्यास, डाग कमी करण्यास आणि मुरुमांना देखील फायदेशीर ठरू शकते. त्यात अँटीऑक्सिडंट्स असतात जे मुक्त रॅडिकल्सशी लढतात आणि वृद्धत्व कमी करतात.

जर संतुलित आहार आणि नियमित व्यायामासोबत आल्याचा चहा घेतला तर वजन नियंत्रित राहण्यास मदत होऊ शकते. कारण आल्यामुळे चयापचय वाढतो, ज्यामुळे शरीरातील अतिरिक्त चरबी जाळण्यास मदत होते. म्हणून, आहारात या चहाचा नक्कीच समावेश करावा.

आल्यामुळे घसा आणि वायुमार्गात सूज कमी होते. आल्यामुळे किण्वन, बद्धकोष्ठता आणि पोटफुगी कमी होते. आल्यामुळे रक्त शरीरातील परिसंचरण सुधारते. ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## कोरडा दिवस ?

आहारी गेले जे मदिरेच्या
इतिहास त्याहीचा पहा ना
तिरस्काराचे बनले धनी
ज्वानीतच गेले स्मशाना ..!

नखितरावाणी बायको तुही
सोन्यावानी पोरं . .
काहून गड्या दारू पिऊन
करतो संसाराचं मातेरं . . !

येता पगार हाती
नशेत होतो बेभान
कुटूंबाचे हाल होती
समाज देईना सन्मान..!

लाख मोलाची तुही काया
नको लोळु भौ गटारी
दररोज पाळ ड्राय डे
सुखी राहशिल संसारी ..!

# तेल्हारा बस स्टॅन्ड जवळ विनापरवाना अवैध देशी दारूजप्त

तेल्हारा : तेल्हारा बस स्टॅन्ड जवळ एक इसम अवैध देशी दारूची विक्री करीत असल्याची गुप्त व खात्रीलायक माहिती गस्तीवर असलेल्या पोलिसांना मिळाल्याने घटनास्थळी धाव घेऊन पोलिसांनी आरोपी अमोल संजय सोनोने (२५) रा. प्रताप चौक तेल्हारा चे ताब्यातून देशी दारू लावणी संत्रा चे १५ क्वार्टर प्रत्येकी १८० मिली (किंमत १ हजार २०० रुपये) असा मुद्देमाल जप्त केला.अवैध शराब फिर्यादी हेडकॉन्स्टेबल गोपाल बुंदे हे दि. १२ एप्रील २०२५ रोजी तेल्हारा टाऊन मध्ये गस्तीवर असताना त्यांना गुप्त व खात्रीलायक माहिती मिळाल्याने त्यांनी पोलीस कॉन्स्टेबल शिवानंद यांना सोबत घेऊन पंचायत समक्ष घटनास्थळी आरोपीला ताब्यात घेऊन त्याची अंग झडती घेतली असता.

आरोपी जवळील पिशवीत अवैध व विनापरवाना देशी दारू लावणी संत्राचे १५ कॉर्टर प्रत्येकी १८० मिली (किंमत १ हजार २०० रुपये) असा मुद्देमाल जप्त करण्यात येऊन महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ कलम ६५ (ई) अन्वये शनिवार दि. १२ एप्रिल २०२५ रोजी रात्री १० वाजेनंतर कारवाई करण्यात आली आहे. पो. नि. प्रमोद उलेमाले यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल गोपाल बुंदे याप्रकरणी पुढील तपास आहेत.




# प्लास्टिकच्या पिशव्या जनावरांच्या मृत्यूचे कारण ठरत आहेत, म्हणून त्यांचा वापर थांबवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे : डॉ. सुनील लहान

## पर्यावरणपूरक भीम जयंती महोत्सव : गरजू महिलांना शिलाई मशीन वाटप, प्लास्टिकमुक्तीचा अनोखा उपक्रम

**■अकोला,दि १४ (प्रतिनिधी)**

'प्लास्टिकच्या पिशव्या जनावरांच्या मृत्यूचे कारण ठरत आहेत, म्हणून त्यांचा वापर थांबवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे,' असे प्रतिपादन अकोला महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी अँड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प, वझे परिवार तथा नीलेश देव मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भीम जयंती व अमृत महोत्सव कार्यक्रमात केले.

जठारपेठेतील अभिरुची गार्डन येथे आयोजित या भव्य उपक्रमात ११ गोरगरीब व गरजू महिलांना मोफत शिलाई मशीन वाटप करण्यात आले. यासोबतच कापडी पिशव्या तयार करण्यासाठी लागणारे कापड, धागा आणि आगाऊ मजुरी देण्यात आली. या महिलांकडून ५०,००० कापडी पिशव्या तयार करून नागरिकांना मोफत वाटप केली जाणार असून, एका पिशवीसाठी रु. ३.५० इतकी मजुरी निश्चित करण्यात आली आहे.कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तींना हारार्पण व मेणबत्ती प्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले.प्रमुख उपस्थित मान्यवर:डॉ. सुनील लहाने (महापालिका आयुक्त) विजय पारतवार (कर अधीक्षक) अतुल पाटील, विनोद देव, नीलेश देव, जयंत सरदेशपांडे कार्यक्रमाचे विशेष सहभागी व आयोजनात मोलाचा वाटा उचलणारे सदस्य: सौ. रश्मी देव सौ. सीमा सरदेशपांडे सौ. मेघा देशमुख प्रा. प्रेरणा पवार शुक्ला वहिनी विश्वनाथ डांगे कैलास तिरपुडे राहुल तिरपुडे सुधीर मेश्राम नरेंद्र परदेशी सुधीर मस्के शैलेश देव यांच्यासह नीलेश देव मित्र मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ नाट्यकर्मी दिलीप देशपांडे यांनी केले. प्रास्ताविक नीलेश देव यांनी केले, तर आभार प्रदर्शन जयंत सरदेशपांडे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गणेशराव मैराळ, राजू कनोजिया, अजय शास्त्री, अंवतिका मैराळ, डॉ. स्नेहा गोखले, नीलेश पवार, नीलेश दुधलम, विजय वाघ आदींनी परिश्रम घेतले.'एक हात मदतीचा' – बेरोजगार युवकाला इलेट्रिक ऑटो याच कार्यक्रमात बेरोजगार युवक नीलेश दुधलम याला इलेक्ट्रिक ऑटोरिक्षा प्रदान करण्यात आली. बँक सहाय्याच्या माध्यमातून साकार झाला असून, वाहनाच्या चाव्या डॉ. लहाने यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आल्या.



# 'नाचून मोठे होऊ नका, वाचून मोठे व्हा!'

## समाजसेवक गजानन हरणे यांचे जयंती उत्सवात प्रतिपादन




**■अकोला,दि १४ (प्रतिनिधी):**

'माझ्या नावाचा जयजयकार करण्यापेक्षा माझे अपूर्ण राहिलेले कार्य प्राणपणाने पूर्ण करा. जर तुमच्याकडे दोन नाणी असतील, तर एका नाण्याची भाकर घ्या आणि दुसऱ्या नाण्याचे पुस्तक घ्या. भाकर तुम्हाला जगवेल, तर पुस्तक तुम्हाला जगण्याची कला शिकवेल!' विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हे प्रेरणादायी विचार आजही तितकेच समर्पक वाटतात आणि हेच विचार कृतीत उतरविण्याचे आवाहन समाजसेवक गजानन हरणे यांनी केले.अकोला तहसील परिसरात आयोजित सर्वधर्मीय महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव कार्यक्रमात समाजसेवक गजानन हरणे बोलत होते. महामा नवाचा एकच आदेश नाचून मोठे होऊ नका, वाचून मोठे व्हा याचा आजच्या पिढीने विशेषतः तरुणांनी अंतर्मनातून स्वीकार केला पाहिजे, असे सांगत त्यांनी शिक्षणाचे महत्व आणि सामाजिक परिवर्तनासाठी ज्ञानाची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमाचे आयोजन सर्वधर्मीय महामानव जयंती उत्सव समिती, तहसील परिसर, गांधी रोड, अकोला यांच्या वतीने करण्यात आले होते. १४ एप्रिल २०२५ रोजी तहसील आवाराच्या ग्राऊंड फ्लोअरवर पार पडलेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. साहेबराव इंगळे (गुरुजी) यांनी भूषवले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून शरद जावळे ,(उपविभागीय अधिकारी अकोला), गजानन हरणे (समाजसेवक), उषाताई विरक (मनपा नगरसेविका), दिपाली जानोरकर आदि उपस्थित होते.

# अमरावती विमानतळाला डॉ पंजाबराव देशमुख यांचे नांव द्या! : ॲड.गजाननराव पुंडकर

## शासनाने विदर्भातील जनभावनेचा आदर करावा

**■अकोला,दि १४ (प्रतिनिधी)**

विदर्भाचे दैवत शिक्षण महर्षी डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे नांव अम रावती (बेलोरा)विमानतळाला देवून शासनाने विदर्भाचे लोकभावनेचा आदर करावा अशी आग्रही मागणी श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे उपाध्यक्ष तथा शेतकरी नेते ॲड. गजाननराव पुंडकर यांनी केली.

अमरावती विमान तळाची अनेक वर्षांच्या मागणीची पुर्तता होत आहे येत्या १६ एप्रिलला अमरावती मुंबई अमरावती प्रवासी सेवा सुरु होत असून पहिलं विमान हवेत झेपावणारे आहे हा आनंदाचा क्षण अनुभवायला अमरावतीकर आतूर आहेत.याच दिवशी डॉ पंजाबराव देशमुख अमरावती विमानतळ असे नामकरण झाल्यास शासनाने विदर्भीय लोकभावनेचा आदर केल्याचे समाधान होईल व हा आनंद द्विगुणित होईल.या मागणीची पूर्तता होईल असा विश्वास ॲड.गजाननराव पुंडकर यांनी व्यक्त केला आहे.

गत १९मार्चला शिव परिवार तथा शाहू फुले आंबेडकर भाऊसाहेब देशमुख फाऊंडेशन अमरावती द्वारा निवेदन सादर करुन ही मागणी शासनाकडे लावून धरली आहे.श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष शेतकरी नेते ॲड.गजाननराव पुंडकर माजी कुलगुरू गणेश पाटील, किशोर बोरकर आदींचे नेतृत्वाखाली अमरावतीचे निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांचे मार्फतराज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यात आले आहे.

भारतीय राज्य घटनेच्या मसुदा समितीचे सदस्य ,स्वतंत्र भारताचे पहिले कृषीमंत्री भाऊसाहेबांचे राष्ट्रीय शैक्षणिक सामाजिक व कृषी क्षेत्रातील अलौकिक कार्याची दखल घेवून अमरावती विमानतळाला डॉ भाऊसाहेबांचे नांव व विमान तळाचे अग्रभागी भाऊसाहेब देशमुखांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा आदी मागण्याचे निवेदन देत त्यासाठी पाठपुरावा करण्यात आला होता.

या जनतेच्या मागणीची दखल घेवून शासनस्तरावर सकारात्मक हालचाली सुरु आहेत.मागणीची पुर्तता येत्या १६ तारखेलाच व्हावी अशी अपेक्षा ॲड.पुंडकरांनी व्यक्त केली.




# लाखपुरी येथे महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी

मुर्तिजापूर : तालुक्यातील लाखपुरी येथे महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. महात्मा फुले जोतीराव गोविंदराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ – त्यांच निधन २८ नोव्हेंबर १८९० रोजी झाले ), ते महात्मा फुले नावाने लोकप्रिय, हे महाराष्ट्रातील एक सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, जातिविरोधी समाजसुधारक आणि लेखक होते. सामाजिक प्रबोधन, अस्पृश्यता व जातिव्यवस्थेचे निर्मूलन, आणि स्त्रियांना व मागास जातीच्या लोकांना शिक्षण देण्याचे कार्य त्यांनी कार्य केले.

अशा महान व्यक्तीच्या क्रांतीवीर म.ज्योतीबा फुले जयंतीनिमित्त लाखपुरी येथील सिद्धार्थ बौद्ध विहार बस स्टैंड चौक जयंतीचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. सर्वप्रथम महापुरुषाच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. उपस्थिताच्या वतीने हार अर्पण करण्यात आले.

# गीता नगर सखी मंडळाच्या सुंदरकांड उत्सवास सखींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**■अकोला,दि १४ (प्रतिनिधी)**

महिलांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक सेवाकार्यात सक्रिय असलेल्या स्थानिक गीता नगर परीसरातील गीता नगर सखी मंडळाने आयोजित केलेल्या सुंदरकांड महोत्सवाला मोठा प्रतिसाद मिळाला. गीता नगर सखी मंडळाच्या वतीने हनुमान जन्मोत्सवाचे औचित्य साधून स्थानिक गीता नगर परिसरातील श्री रामदेवबाबा–श्री श्यामबाबा मंदिरात सुंदरकांड महोत्सवाचे आयोजन केले होते. यात शहरातील सेवाभावी राजराजेश्वर दरबार सुंदरकांड मंडळाने सामूहिक सुंदरकांड सादर करीत भक्तिभाव निर्माण केला.सर्वप्रथम या सुंदरकांडचा प्रारंभ ची पूजा अर्चना ने करण्यात आला. यावेळी राजराजेश्वर दरबार सुंदरकांड मंडळाचे श्याम शर्मा आणि त्यांच्या संगीत पथकाने संगीतमय सुंदरकांड भक्तिभावाने सादर केले. सर्वप्रथम, या उत्सवाची सुरुवात आरती आणि पूजेने करण्यात आली. यावेळी भजन गायक श्याम शर्मा,सौ रविता शर्मा आणि संगीत टीमचे सखी मंडळातर्फे स्वागत करण्यात आले. महोत्सवात एकत्रितपणे संगीतमय सुंदरकांड आयोजित करण्यात आले होते. यावेळी श्री रामदेवबाबा–श्री श्यामबाबा सेवा समितीचे अध्यक्ष ओम प्रकाश गोयनका व विश्वस्तांनी गीता नगर सखी मंडळाचे आभार मानले. प्रत्येक उत्सवात श्री रामदेवबाबा –श्री श्यामबाबा मंदिराचा लाभ घेण्याचे आवाहन गोयनका यांनी यावेळी केले. या उत्सवात गीता नगर सखी मंडळाच्या बहुसंख्य सखी, श्री रामदेवबाबा–श्री श्यामबाबा सेवा समितीचे पदाधिकारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशी माहिती श्री राम देवबाबा–श्री श्यामबाबा सेवा समितीचे ट्रस्टी गजेंद्र सारडा यांनी दिली.



# हनुमान सेनेच्या अकोला जिल्हाध्यक्षपदी बाळू ढोले पाटील यांची निवड




**■अकोला,दि १४ (प्रतिनिधी)**

अकोला जिल्ह्यातील धार्मिक व सामाजिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे सामाजिक कार्यकर्ते बाळू ढोले पाटील यांची हनुमान सेनेच्या अकोला जिल्हाध्यक्षपदी सर्वानुमते नुकतीच निवड करण्यात आली. त्यांच्या या निवडीमुळे सर्वत्र अभिनंदनाचे सूर उमटत आहेत.

हनुमान जयंतीनिमित्त अकोला महानगराचे प्रथम नागरिक, माजी महापौर व कट्टर हनुमान भक्त म दनभैया भरगड यांच्या हस्ते हनुम ान सेनेच्या बॅनरचे विधिवत विम ोचन करण्यात आले. या विशेष प्रसंगी हनुमान सेनेचे संस्थापक अध्यक्ष बाळू ढोले पाटील, अकोला महानगरपालिकेचे माजी नगरसेवक दीप मनवाणी, युवा नेते अभिषेक भरगड , समाजसेवक गजानन हरणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.हनुमान सेना ही धार्मिक कार्यासाठी, धर्म जनजागृती व धर्म संरक्षणासाठी कार्यरत राहील, अशी माहिती या वेळी नवनियुक्त जिल्हाध्यक्ष बाळू ढोले पाटील यांनी दिली. त्यांनी सांगितले की, युवाशक्तीला सोबत घेऊन धार्मिक व सामाजिक कार्यात अधिक व्यापकपणे योगदान देण्याचा मानस असून, सर्व समाजघटकांना एकत्र आणून हिंदू धर्माच्या मूल्यांचा प्रचार व प्रसार केला जाईल.या निवडीमुळे अकोला जिल्ह्यात हनुमान सेनेच्या कार्याला नवी दिशा मिळणार आहे. बाळू ढोले पाटील यांचा कार्यकर्तृत्वाचा अनुभव व त्यांची जनमानसातील लोकप्रियता निश्चितच संघटनेच्या विस्तारासाठी उपयुक्त ठरणार आहे.

# भारतीय योग संस्थानच्या शंख प्रक्षालन शिबिरास उत्तम प्रतिसाद



**■अकोला,दि १४ (प्रतिनिधी)**

भारतीय योग संस्थान दिल्ली संलग्न अकोला जिल्ह्याच्या वतीने स्व अण्णासाहेब रोकडे मिलन सभागृह अकोला येथे आयोजित शंख प्रक्षालन शिबिर व शुध्दीक्रिया शिबिरास येथे साधकांनी उत्तम प्रतिसाद दिला. सदर शिबिराचे उद्घाटन दीप प्रज्वलन व भारतीय योग संस्थान दिल्ली चे संस्थापक स्व. प्रकाशलालजी यांच्या प्रतिमेचे पूजनाने करण्यात आले. भारतीय योगा संस्थानच्या विदर्भ विभाग प्रमुख सौ.कैलाश राजन पटेल व राज्य सदस्य डॉ राजन पटेल, विदर्भ उपप्रमुख भारत म दान यांनी ऑनलाईन पध्दतीने साधकांना शंख प्रक्षालनाबाबत माहिती दिली. अकोला जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली अकोला जिल्हयातील एकूण ४० महिला व पुरुष साधकांनी शंख प्रक्षालन केले.जिल्हा मंत्री श्यामकांत काळे यांनी शुध्दीक्रिया करून घेतल्या.यावेळी विभागीय सहमंत्री राजेंद्र लाडखेडकर, जिल्हा प्रधान विजय गोखले व डॉ उजाली सोमानी,जिल्हा मंत्री श्यामकांत काळे व प्रा. श्रीकांत मोहाळे जिल्हा संघटन मंत्री प्रा प्रवीण ढोणे ,शिबिर प्रमुख राकेश मिश्रा, आदींनी मनोगत व्यक्त केले. साधकांम धून कपिल अग्रवाल, दर्शना ढोले, जोशी, देशपांडे आदींनी शंख शंखप्रक्षालन बाबत आपले अनुभव सांगितले.या शिबिरात संचालन कल्पना बिडवे तर आभार प्रदर्शन शिबिर उप प्रमुख सुषमा लहरिया यांनी केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी भारतीय योग सस्थान दिल्ली, अकोला जिल्हाचे शंखप्रक्षालन शिबिर प्रमुख राकेश मिश्रा, शिबिर उपप्रमुख सुषमा लहरिया, सुषमा गोखले,विजय राऊत, मीनाक्षी मुळे ,शोभा अग्रवाल,सुषमा शेगोकार, मुरलीधर कौसल, संतोष हुतके आदीसह अनेकांनी परिश्रम घेतले.

# दुचाकी चोरीप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

बाळापूर : इंदिरानगर, वाडेगाव येथून घरासमोर उभी करून ठेवलेली दुचाकी चोरी गेली होती. ती दुचाकी बाळापूर येथे दिसल्याची घटना शनिवार दि. १२ एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास उघडकीस आली असून दुचाकी वाडेगाव येथील एका व्यक्तीने चोरून बाळापूर येथील युवकाला विकल्या प्रकरणी बाळापूर पोलिसात शनिवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास दोघा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यां संदर्भात बाळापूर पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार गुलाम वाहिद गुलाम जाफर वय २२ वर्ष इंदिरानगर वाडेगाव या युवकाने बाळापूर पोलीस स्टेशन ला दिलेल्या फियादी वरून मोटार सायकल बी जी ३४७५ किंमत अंदाजे ४० हजार रुपये रात्री घरासमोर उभी करुन ठेवली होती. मात्र दुसऱ्या दिवशी जागेवर ती दुचाकी दिसली नाही. त्या गाडीचा शोध घेतला मात्र दुचाकी मिळून आली नाही. त्यामुळे पोलीस स्टेशनला तक्रार देण्याकरिता बाळापूर येथे जात असताना ती दुचाकी शेख राजीक रा.कालेखानेपुरा बाळापुर याच्या जवळ दिसली.

# छावा संघटनेच्या शिबिरात ७५ गावकऱ्यांनी केले रक्तदान



**■अकोला,दि १४ (प्रतिनिधी)**

येथून जवळच असलेल्या तांदळी येथे छावा संघटनेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ७५ गावकऱ्यांनी रक्तदान करून आपले सामाजिक दायित्व सिद्ध केले . सध्या रक्तदानाची अत्यावश्यक गरज लक्षात घेऊन छावा संघटनेतर्फे रक्तदान शिबिरांवर विशेष भर देण्यात येत असतो. त्यानुसार छावाचे जिल्हाप्रमुख शंकरराव वाकोडे यांच्या पुढाकाराने सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते

प्रत्येक वर्षी १४ मे रोजी छावा संघटनेतर्फे छत्रपती संभाजी राजे यांची जयंती भव्य प्रमाणात विविध कार्यक्रमासह साजरी करण्यात येत असते. या कार्यक्रमाची जनजागृती करण्याच्या हेतूने व युवकांचा उत्साह वाढविण्याकरिता छावा संघटनेतर्फे एक महिना आधीपासून ग्रामीण भागात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते. त्यानुसार तांदळी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येऊन या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या विविध कार्यक्रमांसाठी शंकरराव वाकोडे यांचे नेतृत्वाखाली छावाचे जेष्ठ मार्गदर्शक डॉ. दीपक मोरे, डॉ. श्रीराम लाहोळे, डॉ. संजय सरोदे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख प्रदीप खाडे, अरविंद कपले, अमोल हिंगणे, निवृत्ती वानखडे,अनिरुद्ध भाजीपाले, बबलू वसु, आशु वानखडे यांचे सह इतरही सर्वच पदाधिकारी व सदस्य परिश्रम घेत असतात.


**CHANGE IN NAME**

I Have Change My Name
----From----
WASEEM KHAN
-----TO-----
WASIM KHAN
My Passport No is - K0673362
My Residential Address is - Kasam Khan Manjil, Akot Stand Behind Manik Talkies Akola 444001


# आसरा माता मंदीर जीर्णोद्वार सोहळा व कलशारोहन संपन्न

**■हिवरखेड,दि १४ (प्रतिनिधी) :**

येथील पुरातन कालीन विहीरीवर आसरा मातेचे लहानसे मंदिर होते नळयोजनेमूळे वीहिरी भूजल्या गेल्या त्या ठिकानी आसरा मातेचे मंदीर निमीतीचा ऊपक्रम लोकसहभागातुन मंदीर समितीकडुन पुर्णत्वाचा सकल्पपुती होऊन त्या निमित्त आज मूती स्थापने निमित्त हभप भागवताचार्य वीठ्ठलमहाराज तेल्हारकर यांचे देव बैसले सिंहासंनी या अभंगावर किर्तन झाले यावेळी विठ्ठल मंदिरचे वारकरी व गाडेगाव चे श्रिकृष्ण मूळे गजानन कोकाटे बाळकृष्ण वाकोडे,नरेद्र काळे, ज्ञानेश्वर ताथोड, या साथर्कयाचे सहयोगाने किर्तनाला रगंत आनली तर या नंतर,मूतीची व कलशाची वीधीवत पुजनासाठी पुरोहित श्री जयेश जोशी व पडिंत जोशी यांचे पौरोहितात यजमान झालेले सात जोडपे संतोष नेरकर, राजाराम बांते,विठ्ठल भाकरे,अमोल नेरकर, ज्ञानेश्वर मानकर, पवन नेरकर सागर ऊगले या सात यजमान व सौभाग्यवतीसह मूर्ति स्थापना कलश स्थापना यज्ञ पुजनात सहभाग घेत हवनामधे आहूत्या अर्पण केल्या त्यांनतर कीर्तन कार हभप तेल्हारकर महाराज यांनीआसरा माता मूती व शिवपींड व नंदीची विधिवत पुजनानंतर स्थापना केली.

यामूतीची व कलशाची आधल्या दिवशी वाजतगाजत मिरवनूक काढन्यात आली तर आज१४/४/२५ ला सकाळपासूनच वीधी पुर्वक पुजा हवन यजमानहस्ते परत होऊन मंदीरावर कलशारोहन वीठ्ठल महाराज तेल्हारकर यांचे हस्ते वीधीपुर्वक झाले त्या नंतर ऊपस्थीत लेकीबाळी यानी व बीट अमलदार महादेव नेवारे सौ अनीता नेवारे रमेशभाऊ दुंतोंडे सूरेश ओकारे श्रीकृष्ण ऊंबरकार,महेद्र भोपळे कराळे परीवार,यांनी महाआरती मधे सहभाग घेतला व यज्ञामधे आहूत्या अर्पण करत आसरा मातेचा आशीर्वाद घेतला तर आसरामाता मंदीर समीती चे पदाधिकारी व आसरा माता नवदुर्गाऊत्सव समितीचे व बाल गजानन महाराज पालखी मंडळ व बालका कडून कीर्तनकार व सहकार्यांचा शेला व दुपट्टे नारळ देऊन सन्मान केला आसरा मातेचा जयजयकार गजरात महाप्रसादाला ऊपस्थीती करत सर्वानी सदा नंदी का ऊदोच्या दर्शवीली



# पाय गमावले, जिद्द नाही



आजची यशोगाथा अशा एका व्यक्तीची आहे ज्याने बालपणी दोन्ही पाय गमावूनही जीवनात कधीच हार मानली नाही. 'जेईई डव्हान्स्ड' परीक्षा उत्तीर्ण केली आणि 'आयआयटी' मद्रासमध्ये शिक्षण घेतल्यानंतर आता तो गुगल कंपनीत काम करत आहे. नागा नरेश असे या तरुणाचे नाव असून त्याची कथा अत्यंत प्रेरणादायी आहे. एखाद्या व्यक्तीमध्ये काहीतरी करण्याची जिद्द असेल तर तो काहीही करू शकतो. नागा नरेशने आपल्या उदाहरणातून हे दाखवून दिले आहे. त्याचा जन्म गोदावरी नदीच्या काठावर वसलेल्या आंध्र प्रदेशातील टिप्पररू या छोट्याशा गावात झाला. त्याचे वडील ड्रायव्हर आणि आई गृहिणी असून दोघेही शिकलेले नव्हते. कुटुंबाचा खर्च नीट चालावा एवढीच त्यांची इच्छा होती. अशाप्रकारे गरिबी आणि खडतर आयुष्य जगत असतानाच नागा नरेशला अपघात झाला आणि दोन्ही पाय गमवावे लागले. नागा नरेश सांगतो की, अपघातानंतर त्याला एका खासगी रुग्णालयात नेण्यात आले. पण आई-वडिलांकडे पैसे नसल्यामुळे तेथे उपचार करण्यास नकार देण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी त्याला सरकारी रुग्णालयात नेले. तिथे डॉक्टरांना त्याचे दोन्ही पाय कापावे लागले. या घटनेने नागा नरेशचे आयुष्य कायमचे व्हीलचेअरवर बंदिस्त झाले.

**अपंगात्वर मात, 'जेईई'त यश**

अपंग झालेला नागा नरेश सुरुवातीपासून अभ्यासात चांगला होता. पण गरिबीमुळे त्याला शाळा सोडावी लागली. नंतर त्याचे कुटुंब तनुकू येथे गेले. तिथे त्याला मिशनरी शाळेत दाखल करण्यात आले. शारीरिकदृष्ट्या अपंग असूनही नागा नरेश अभ्यासात चांगली कामगिरी करत राहिला आणि त्याला मित्रांकडूनही चांगले सहकार्य मिळत गेले. शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याने 'आयआयटी-जेईई' परीक्षेसाठी कठोर तयारी केली आणि उत्तीर्णही झाला. ही देशातील सर्वात कठीण परीक्षांपैकी एक असल्याचे आपण जाणतो. या परीक्षेत त्याने ९९२ वा क्रमांक पटकावला तर अपंग गटात त्याला चौथा क्रमांक मिळाला.

अचिव्हर

**'आयआयटी'त प्रवेश**

'जेईई अ‍ॅडव्हान्स' पास केल्यानंतर नागा नरेशला 'आयआयटी' मद्रास येथे बी.टेक. मध्ये प्रवेश मिळाला. एका ट्रेनमध्ये नागा नरेशची सुंदर नावाच्या व्यक्तीशी भेट झाली. त्याने त्याच्याकडून वसतिगृहाची फी घेण्याचा आग्रह धरला. खेरीज त्याच्यावर उपचार करणाऱ्या रुग्णालयानेही कॉलेजचे शिक्षण करण्यासाठी मोठी मदत केली. पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नागा नरेशला देशातील तसेच जगातील अनेक मोठ्या कंपन्यांकडून चांगल्या ऑफर मिळाल्या. त्याने 'गूगल' मध्ये सॉफ्टवेअर अभियंता म्हणून कार्यरत होण्याचा निर्णय घेतला. त्याच्या पुढील प्रवासाला अनंत शुभेच्छा.

# युवा मानस

## फंडू एसएमएस

जिंदगी यूँही बहुत कम है
मोहब्बत के लिए,
फिर एक दुसरे से रूठकर
वक्त गँवाने की क्या जरूरत है।

नहीं बसती किसी और की सूरत
अब इन आंखो में,
काश की हमने तुझे,
इतने गौर से ना देखा होता।

काम ऐसा करो की
फेसबुकही नहीं,
जिंदगी में भी लाईक
मिले।




# संयुक्त राष्ट्रात काम करायचे? मग हे करा

'युनायटेड नेशन्स'शी संबंधित प्रतिष्ठित संस्थेत काम करण्याचे स्वप्न पाहत असाल तर युनेस्को (युनायटेड नेशन्स एज्युकेशनल, सायंटिफिक अँड कल्चरल ऑर्गनायझेशन) एक उत्तम संधी देत आहे. अलिकडेच इथे पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. तिथे जागतिक स्तरावर काम करण्याचा अनुभव मिळू शकेल. या इंटर्नशिपमुळे कौशल्य विकासच होणार नाही, तर नेटवर्किंग आणि करिअर वाढीसाठीदेखील मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

**कोण करू शकतो अर्ज?**

* पदव्युत्तर पदवी, पीएच.डी. किंवा समकक्ष अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेले उमेदवार अर्ज करू शकतात.
* गेल्या १२ महिन्यांत पदव्युत्तर पदवी किंवा पीएच. डी. पूर्ण केलेले उमेदवारही पात्र आहेत.

पदवी अभ्यासक्रमात प्रवेश न घेतलेले पदवीधारक अर्ज करण्यास पात्र नाहीत.

**वयोमर्यादा:** उमेदवाराचे किमान वय २० वर्ष असावे. सचिवीय/ तांत्रिक किंवा व्यावसायिक असाइनमेंटसाठी अर्ज करणारे उमेदवार संबंधित संस्थेच्या अंतिम वर्षात असावेत किंवा नुकतेच पदवी पूर्ण केलेले असावेत.

**इंटर्नशिपचा कालावधी**

किमान: १ महिने

जास्तीत जास्त: ६ महिने

अर्ज करणाऱ्या सर्व उमेदवारांनी आपला संपर्क तपशील सहा महिन्यांसाठी वैध राहील याची खात्री करणे आवश्यक आहे.

**भाषा**

अर्ज इंग्रजी किंवा फ्रेंच भाषेत भरणे बंधनकारक आहे. कागदपत्रे इंग्रजी किंवा फ्रेंचभाषेत नसतील तर अनौपचारिक भाषांतर सादर करावे लागेल.

**निवड प्रक्रिया**

व्यवस्थापक निवड झालेल्या उमेदवारांशी थेट संपर्क साधेल. सहा महिने उत्तर न मिळण्याचा अर्थ निवड झाली नाही, असा घ्यावा.

**कोणत्या विभागात मिळणार इंटर्नशिप?**

या इंटर्नशिप प्रोग्रामसाठी अर्ज करू इच्छिणारे ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत खालील विभागांकडे अर्ज करू शकतात. गव्हर्निंग बॉडी, डायरेक्टर ऑफ कम्युनिकेशन अँड इन्फॉर्मेशन सेक्टर, एज्युकेशन सेक्टर, कल्चर सेक्टर, ब्यूरो ऑफ ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट, इंटरगव्हर्नमेंटल ओशनोग्राफिक कमिशन, कम्युनिकेशन अँड पब्लिक एंगेजमेंट, नॅचरल सायन्स सेक्टर, डिजिटल बिझनेस सोल्यूशन्स

करीअर ग्रोथ

**अर्ज कसा करायचा?**

युनेस्कोच्या अधिकृत संकेतस्थळावर जा. मागितलेले सर्व आवश्यक शैक्षणिक आणि वैयक्तिक तपशील भरा.

# उन्हाळ्यातील आरामासाठी...



दोस्तांनो, कपाटात ठेवलेल्या शॉर्टस बाहेर काढण्याचे हेच दिवस आहेत. उन्हाळ्यात मोकळेढाकळे कपडे घालावे लागतात. त्यामुळे या काळात कॅज्युअल ऑकेजनला शॉर्टस आणि टी-शर्ट हा बेस्ट ड्रेस ठरेल. तुमच्याकडे शॉर्टस नसतील तर विकत घ्या. उन्हाळ्यात भटकंती करणार असाल तर शॉर्टसना पर्याय नाही. मित्रमैत्रिणींसोबत कॅज्युअल आउटिंग असो किंवा घरात आराम करायचा असो, शॉर्टस आणि टी-शर्ट इतका आरामदायी पेहराव तुम्हाला शोधूनही सापडणार नाही. हटके प्रिंट्स आणि रंग बिनधास्त कॅरी करणाऱ्या मुलांसाठी शॉर्टसचे असंख्य पर्याय बाजारात उपलब्ध आहेत.

अत्यंत आकर्षक रंगसंगती आणि प्रिंट्स असणाऱ्या शॉर्टस मिळत असल्या तरी उन्हाळ्यात तुमच्याकडे पांढरी शॉर्टस असणं गरजेचं आहे. उन्हाळ्यात थंडावा देणाऱ्या पांढऱ्या रंगाची चलती असते. म्हणूनच या दिवसात पांढरे कपडे घातल्याने तुम्हाला आरामदायी वाटतं. तसंच पांढऱ्यावर कोणत्याही रंगाचा टी शर्ट शोभून दिसतो. तुम्ही फ्लोरल शर्टही त्यावर घालू शकता. लाल, निळा, हिरवा, पिवळा या रंगाच्या शॉर्टसही छान दिसतात.

फॅशन पॅशन

## टेक अपडेटस्

### 'विवो' देणार 'अ‍ॅपल' आणि 'सॅमसंग'ला टक्कर




चिनी कंपनी 'विवो'ने हेडसेटच्या बाबतीत 'अ‍ॅपल' आणि 'सॅमसंग'ला टक्कर देण्यासाठी कंबर कसली आहे. कंपनीने चीनमध्ये आयोजित एका कार्यक्रमात आपल्या 'विवो व्हिजन' ची झलक दाखवली आहे. कंपनीने सांगितले, की सध्या ते 'रोबोटिक्स अ‍ॅप्स'च्या संगणकीय क्षमता मजबूत करण्यावर काम करत असून व्हिजन हेडसेट त्याचाच एक भाग आहे. या डिव्हाईसची रचना स्कीइंगसाठी वापरल्या जाणाऱ्या गॉगल्ससारखी आहे. संवर्धित वास्तव आणि आभासी वास्तव सक्षम करण्यासाठी त्यावर अनेक सेन्सर लावण्यात आले आहेत. फ्रेमच्या खाली दोन सेन्सर आहेत. ते हात आणि बोटांच्या जेश्चर ट्रॅकिंगसाठी काम करतील. दीर्घकाळचा वापर आरामदायी करण्यासाठी हेडबँडमध्ये पॅड लावण्यात आला आहे. मात्र हे 'स्टँडअलोन युनिट' म्हणून काम करेल वा त्याला 'वायर्ड कनेक्शन' प्रणालीची आवश्यकता असेल हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## टेक टॉक

### इटलीत 'चॅटजीपीटी'वर बंदी



'चॅटजीपीटी' ने जगभर खळबळ माजवली आहे. अनेक लोक 'चॅटजीपीटी' चा आधार घेत काम सोपे करत आहेत, तर अनेकांना याची भीती वाटते. लोकांना भीती वाटते, की 'एआय' मानवावर वर्चस्व गाजवू शकते. यासोबतच अनेक लोक प्रायव्हसीशी संबंधित समस्याही सांगत आहेत. अलीकडेच इटलीमधील डेटा संरक्षण प्राधिकरणाने गोपनीयतेच्या समस्येचा हवाला देत ओपन 'एआय'च्या व्हायरल एआय चॅटबॉट चॅटजीपीटीवर बंदी घातली आहे. 'ओपन एआय' वापरकर्त्यांना इतर वापरकर्त्यांच्या चॅटबॉट संभाषणांची शीर्षके पाहण्याची परवानगी देते. ही बाब निश्चितच गोपनीयतेसाठी चांगले नाही. तथापि, 'एआय चॅटबॉट चॅटजीपीटी'वर बंदी घालणारा इटली हा एकमेव देश नाही. यापूर्वी उत्तर कोरिया, इराण, रशिया आणि चीन या देशांनी विविध कारणे सांगून 'ओपन एआय'च्या 'एआय टूल्स'वर बंदी घातली आहे.

## मार्केट अपडेट

### 'अ‍ॅपल'च्या फोल्डेबल आयफोनची किंमत किती?



'अ‍ॅपल'चा पहिला वहिला फोल्डेबल फोन नजिकच्या काळात बाजारात येणार आहे. तो कसा असणार याबाबत सर्वांनाच उत्सुकता लागली आहे. 'अ‍ॅपल' चा हा फोन प्रीमियम कॅटगरी अंतर्गत महागड्या प्राईस टॅगसह लाँच होण्याची शक्यता आहे. 'इंडस्ट्री एनालिस्ट टीम लाँग' ने केलेल्या दाव्यानुसार फोल्डेबल आयफोनची किंमत अमेरिकेत २३०० डॉलर (सुमारे १,९१,०००) पर्यंत असण्याची शक्यता आहे. 'अ‍ॅपल'चा हा पहिला फोल्डेबल आयफोन २०२६ मध्ये बाजारात येऊ शकतो. २०२७ च्या सुरुवातीला कंपनी तो जागतिक बाजारात आणू शकते.



# आहारी जाणे टाळा

सध्या गिब्ली ट्रेंडचे वारे आहे. सगळेच हा ट्रेंड फॉलो करत या नव्या अवतारातील फोटो पोस्ट करताना दिसत आहेत. मात्र यासारख्या सोशल मिडिया ट्रेंड्सचा गैरवापरही होऊ शकतो, हे लक्षात घ्यायला हवे. विशेषत: तरुणांना त्याचे काही घातक परिणाम बघायला मिळू शकतात. कारण सोशल मिडिया एक वेगळीच, परफेक्ट जीवनाची प्रतिमा निर्माण करतो. त्यामुळे वास्तविक जीवनामध्ये ताण निर्माण होतो.

**मानसिक ताण**

गिब्ली ट्रेंडसारख्या बाबींमुळे तरुणांमध्ये मानसिक ताण वाढू शकतो. हे ट्रेंड्स लोकांना भरपूर प्रसिद्धी किंवा लाइक्स मिळवण्यासाठी धडपडायला प्रवृत्त करतात. हे लोक इतरांचे परफेक्ट जीवन पाहतात, तेव्हा त्यांचा आत्मविश्वास कमी होतो. सोशल मीडियावर लोक आकर्षक किंवा यशस्वी दिसत असले तरी प्रत्यक्षात तशी स्थिती असतेच असे नाही. अशावेळी इतर लोकांचे जीवन पूर्ण असून आपले अपूर्ण असल्याची भावना तरुणांचा ताण वाढवू शकते.

ट्रेंड

**अनावश्यक तुलना**

सोशल मीडिया कधी कधी अनावश्यक तुलना करण्यास प्रवृत्त करतं. विशेषत: गिब्लीसारख्या ट्रेंड्समध्ये लोक आपल्या व्हिडीओज किंवा पोस्टसमध्ये मोठ्या प्रमाणात गुंततात तेव्हा इतरांशी तुलना करून स्वतःला कमी समजायला लागतात.


**सोशल मिडियाच्या आहारी जाणे**

ट्रेंड्स फॉलो करण्यात अधिक वेळ घालवण्यामुळे सोशल मिडिया वापराच्या आहारी जाण्याचा धोका असतो. मुळेही मानसिक थकवा, नैराश्य आणि ताण वाढू शकतो.

**सामाजिक असुरक्षितता**

अनेकदा, गिब्ली ट्रेंड्ससारख्या गोष्टींमुळे सामाजिक पातळीवर असुरक्षितता निर्माण होऊ शकते कारण यानिमित्ताने असंख्य लोकांची वैयक्तिक माहिती, त्यांच्या कुटुंबियांचे फोटो, मित्रमंडळींसह काढलेले फोटो कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे काम करणाऱ्या कंपन्यांना सहजी उपलब्ध होतात. त्यामुळेच पुढे जाऊन त्याचा चुकीचा कारणासाठी उपयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे सर्व लक्षात घेता ट्रेंड्सच्या आहारी किती जायचे हे ठरवा. मुख्य म्हणजे सोशल मीडियाचा वापर सकारात्मक उद्देशांसाठी करा. मानसिक आरोग्य जपण्यासाठी काही वेळ सोशल मिडिया पासून ब्रेक घ्या. सोशल मीडियापासून प्रेरणा मिळवा मात्र इथे तुलना असू नये. इथे सक्रिय असला तरी आपल्या मार्गावर टिकून राहा. सोशल मीडिया आणि ट्रेंड्सचा योग्य वापर केल्यास ते जीवनात सकारात्मक बदल घडवू शकतात, पण त्याचा अत्याधिक वापर मानसिक आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतो, हे नेहमी लक्षात ठेवा.

# हा पर्याय समोर आहे




मी २८ वर्षांची तरुणी असून जोडीदाराच्या शोधात आहे. आयुष्याच्या या टप्प्यावर मी खूप गोंधळून गेले आहे. मध्यंतरी माझ्या एका मित्राने लग्नाचा प्रस्ताव ठेवला. आम्ही चार वर्षांपासून एकमेकांना ओळखतो. तो खूप चांगला मुलगा आहे. व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी आणि मोकळ्या विचारांचा आहे. त्याच्याशी लग्न करणं हा खरं तर खूप चांगला निर्णय असू शकतो. पण आमच्या आवडीनिवडी वेगळ्या आहेत. त्याचं व्यक्तिमत्त्व फारसं आकर्षक नाही. अनेकदा त्याच्याशी संवाद साधणंही कठीण होऊन बसतं. त्याच्याबद्दल माझ्या मनात प्रेम नाही. मी काय करू? तो सर्वार्थाने चांगला आहे म्हणून होकार देऊ की त्याच्यावर प्रेम नसल्याने नाही म्हणू?

**उत्तर :** सर्वप्रथम तू तुझ्या भावनांचं विश्लेषण कर. जोडीदारामध्ये कोणते गुण हवे आहेत याचा विचार कर. नात्यामध्ये कशाला प्राधान्य देणार आहेस, हे ठरव. एकीकडे तो खूप चांगला मुलगा आहे, त्याच्याशी लग्न करणं हा योग्य निर्णय ठरेल असं तू म्हणतेस. पण दुसरीकडे त्याचं व्यक्तिमत्त्व आकर्षक नसल्याचा आक्षेप घेते. व्यक्तिमत्त्व नंतर घडवता येतं. प्रत्येक माणसात काही चांगले तर काही वाईट गुण असतात. त्याच्यातही काही दुर्गुण असतील. तुझ्या बाबतीतही हेच म्हणता येईल. तेव्हा लग्नाचा निर्णय घेण्याआधी समुपदेशकाची मदत घेता येईल. हा पर्याय निवडून बघ. त्यानंतरच निर्णय घे.

मॅच मेकिंग

# ट्रेडमिलवर व्यायाम करताना...

अनेकजण जीममध्ये ट्रेडमिलवर व्यायाम करतात. मात्र ट्रेडमिल वापरताना हँडल धरावे किंवा नाही असा प्रश्न पडतो. प्रत्यक्षात ट्रेडमिलवर व्यायाम करताना हँडल धरणं योग्य नाही, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. ट्रेडमिलचं हँडल फक्त आणि फक्त तुमच्या सुरक्षेसाठी असतं. त्याचा दुसरा कोणताही उपयोग नसतो. हँडल धरल्याने आपण खूप जोरात धावत आहोत, असं तुम्हाला वाटतं. पण याचा परिणाम शरीरातल्या ऊर्जेवर होतो. हँडल धरून धावल्यामुळे तुम्हाला दमल्यासारखं वाटतं. हँडल धरल्यामुळे धावणं किंवा चालण्याचे लाभ मिळत नाहीत, असंही तज्ज्ञ सांगतात.



ट्रेडमिलवर व्यायाम करताना हँडल धरल्याचे बरेच दुष्परिणाम आहेत. पहिलं म्हणजे तुम्ही खूप कमी कॅलरी खर्च करता. शरीराचं संतुलन साधू शकत नाही. शरीराची स्थिती बिघडते. हँडल धरल्यावर हातांची हालचाल होत नाही. धावताना किंवा चालताना हातांची हालचाल होणं महत्त्वाचं असतं. शरीर पुढच्या बाजूला झुकण्याच्या दृष्टीने हातांची हालचाल महत्त्वाची असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. ट्रेडमिलची गती खूपच जास्त असेल तर हँडल धरल्याने तुम्ही पडू शकता. हँडल धरल्याने पायांवरचा ताण कमी होतो. पण शरीराच्या वरच्या भागावरचा ताण वाढतो. याचा परिणाम शरीराच्या खालच्या भागाच्या कार्यक्षमतेवर होतो. त्यामुळे बाहेर धावता तसंच ट्रेडमिलवर धावायला हवं.

काळजी घ्या



# आग्र्याला जाताय, काय पाहाल?

जगातील सात आश्चर्यांपैकी एक असणारा ताजमहाल पाहण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक आग्रा येथे येतात. चांदण्या रात्री प्रेमाच्या या अद्भुत प्रतीकाचे वैभव पाहणे अनोखे आहे. अनेक पर्यटक ताजमहालला भेट दिल्यानंतर शहरातील प्रसिद्ध पेठा खरेदी करून निघून जातात. तुम्हीही आग्राला जाणार असाल तर अशी चूक करू नका कारण आग्राच्या रस्त्यांवर थोडेसे भटकला तर तुम्हाला समजेल, की इथे ताजमहालाशिवायही पाहण्यासारखे खूप काही आहे. पेठाशिवाय खायला खूप काही आहे आणि आग्राच्या आजूबाजूचा परिसरही अलौकिक आणि सुंदर आहे. त्यामुळे आग्राला जाल तेव्हा बकेट लिस्ट अशा प्रकारे बनवा की खूप आनंद आणि आठवणी घेऊनच परत याल.

* आग्रा किल्ला ताजमहालपासून सुमारे २.५ किलोमीटर अंतरावर आहे. तो 'युनेस्को'च्या वारसा यादीतदेखील समाविष्ट आहे. या किल्ल्यावर अनेक ऐतिहासिक आणि आश्चर्यकारक गोष्टी पाहायला मिळतील.
* **मेहताब बाग:** आग्राला जाऊन शांतता शोधत असाल तर यमुना नदीच्या काठावर वसलेल्या मेहताब बागला नक्की भेट द्या. इथे तुम्हाला पूर्वी कधीच अनुभवली नव्हती अशी शांतता मिळेल.
* **सिंकदरा:** आग्र्याला गेल्यावर सिकंदराला गेला नाहीत तर काहीतरी मिस होईल. मोगल सम्राट अकबराची कबर ताजमहालपासून १० किलोमीटर अंतरावर सिकंदरा येथे आहे. अकबराच्या जीवनाशी संबंधित अनेक ऐतिहासिक पैलू येथे पाहायला मिळतात.
* **इतमाद उल दौलाची कबर:** इतिहासात रस असेल तर तुम्ही ताजमहालपासून सहा किलोमीटर अंतरावर असणाऱ्या या समाधीलाही भेट देऊ शकता. ही संगमरवरी कबर कोरीव कामासाठी जगभर प्रसिद्ध आहे.
* **फतेहपूर सिक्री:** ताजमहालपासून फतेहपूर सिक्री ३५ किलोमीटर अंतरावर आहे. ऐतिहासिक महत्त्व आणि सुंदर वास्तुकलेसाठी पर्यटकांमध्ये या शहराची चर्चा असते.

भटकंती

**खाद्य संस्कृतीचा स्वाद घ्या**

इथे आल्यावर मुगलाई पदार्थ, बेधई आणि जिलेबी, चाट-पकोरी आणि तंजूरी पदार्थांची चव अवश्य घ्या. पेठा, संगमरवरी उत्पादने, चामड्याच्या वस्तू, हाताने विणलेले गालिचे, जरदोजी भरतकामाचे सामान आदी तुम्ही इथे खरेदी करू शकता.

**आसपास भेट देण्याची ठिकाणे**

* मथुरा-वृंदावन (आग्र्यापासून सुमारे ७० किलोमीटर अंतरावर)
* भरतपूर पक्षी अभयारण्य (सुमारे ५५ किलोमीटर अंतरावर)
* चंबल सफारी (सुमारे ८७ किलोमीटर अंतरावर)
* कीथम लेक (३४ किलोमीटर) इथे तुम्ही सूरसरोवर पक्षी अभयारण्याला भेट देऊ शकता.

## पूर्व विदर्भातील शिक्षक भरती घोटाळा

# निलेश मेश्राम मुख्य सूत्रधार

### महाशयाच्या अनेक शाळा, ५० कोटींवर मालमत्ता

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :** नागपूर जिल्ह्यातील खाजगी प्राथमिक शाळांमध्ये ५८० अपात्र (बोगस) शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी असल्याचे समोर आले आहे. आता या प्रकरणी पोलिसांनी ही कारवाई सुरू केली आहे.

भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील एका शाळेत अपात्र मुख्याध्यापकाच्या नेमणुकीच्या प्रकरणात आधीच नागपूर विभागाचे शिक्षण उपसंचालक उल्हास नरड आणि बनावट नियुक्ती मिळालेले मुख्याध्यापक पराग पुंडके यांना अटक करण्यात आली होती. त्यानंतर आता नागपूर पोलिसांनी बनावट मुख्याध्यापक प्रकरणाचा तपास करताना त्यांच्या तपासाची व्याप्ती वाढवत ते अपात्र शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीपर्यंत नेले आहे.

त्या अनुषंगाने रात्री नागपूर पोलिसांनी अधीक्षक वर्ग दोन, माध्यमिक शिक्षण अधिकारी कार्यालयातील निलेश मेश्राम, शिक्षण उपसंचालक कार्यालयातील उपनिरीक्षक संजय दुधाळकर आणि वरिष्ठ लिपीक सुरज नाईक या तिघांना अटक केली आहे. परंतु, अनेक वर्षापासून बनावट कागदपत्रांच्या आधारे शिक्षकांचे पदोन्नतीचे प्रस्ताव तयार करणे, त्यांना बढती मिळवून देणे, बनावट शालार्थ आयडी तयार करण्यासाठी कागदपत्रांची मदत करण्यात निलेश मेश्राम अग्रेसर असल्याची माहिती आहे. या संपूर्ण घोटाळ्याचा मुख्य सूत्रधारच निलेश मेश्राम असल्याची चर्चा असून त्याची जवळपास ५० कोटी रुपयांची संपत्ती असल्याचाही आरोप होत आहे.

विभागीय शिक्षण उपसंचालक उल्हास नरड यांना रविवारी सदर पोलिसांनी गडचिरोली येथून अटक केली. त्यांच्याविरोधात मुन्ना तुलाराम वाघमारे (वय ३८, रा. पालांदूर, भंडारा) यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. २०१० मध्ये मुख्याध्यापक पराग पुडके याला शिक्षक पदाचा अनुभव नसताना तसेच शिक्षक म्हणून कोठेही काम केले नसताना थेट मुख्याध्यापक बनविण्यात आले हा आरोप नरड यांच्यावर आहे.

जिल्ह्यात २०१९ पासून सुमारे ५८० प्राथमिक शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक मान्यतेचे तसेच, शालार्थ आयडी प्रदान करण्याच्या आदेशांची कोणतीही शहानिशा न करता, बनावट शालार्थ आयडी प्रदान करून नियमबाह्य पद्धतीने वेतनास पात्र नसलेल्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्यात आले. या प्रकरणाच्या चौकशीमध्ये प्राथमिक वेतन पथकाचे अधीक्षक नीलेश वाघमारे दोषी असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे शासनाने वाघमारे यांना पुढील कारवाई होईपर्यंत निलंबित केले आहे.

निलेश मेश्राम हे २००४ पासून शिक्षण उपसंचालक कार्यालयात कार्यरत होते. यादरम्यान त्यांनी अनेक बनावट कागदपत्रे तयार केल्याचा आरोप होत आहे. तसेच प्रत्येक कामांसाठी पैसे घेतले जात होते.

अटकेत असलेले मुख्याध्यापक पुडके यांचे बनावट कागदपत्रे तयार करून देण्यासाठी मेश्राम यांनी दहा लाख रुपये घेतल्याची माहिती आहे. सध्या निलेश मेश्राम माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात कार्यरत आहे. त्यांच्या नागपूर येथे पाच शाळा असल्याची माहिती आहे.

सेंट विल्सेंट कॉन्व्हेंट मनीष नगर नागपूर, सेंट विल्सन कॉन्व्हेंट खामला नागपूर, मनीष हायस्कूल खामगाव, तालुका सावनेर अशा तीन शाळांची नावे सध्या समोर आली आहेत. सेंट विल्सेंट कॉन्व्हेंटचे पूर्वीचे नाव नवचैतन्य विद्यालय असे होते. त्या शाळेचे नाव बदलवून अल्पसंख्याक दर्जा देण्यात आल्याची माहिती आहे. या शाळेवर मेश्राम यांच्या पत्नी मुख्याध्यापक असल्याची माहिती आहे. पोलीस प्रकरणाच्या खोलात जात आहेत.



# बाबासाहेबांना एक हजार महिलांची अनोखी मानवंदना

■ **महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १४ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त येथील ब्ल्यूशाईन ग्रुपने दिलेली मानवंदना आगळीवेगळी ठरली. वाचन, नृत्य, नाटिका अशा चौफेर कार्यक्रमाचे आयोजन करून १५ ते ७० वयोगटातील एक हजार महिलांनी बाबासाहेबांना अनोखी मानवंदना दिली.

ब्ल्यूशाईन सांस्कृतिक उपक्रमांतर्गत स्थानिक संविधान चौकात आयोजित कार्यक्रमात संविधान वाचन, भीम गर्जना आणि भीम गीतांवर आधारित सामूहिक नृत्य सादर करण्यात आले. या नृत्याद्वारे महामानवाला मानवंदना अर्पण करण्यात आली. यामध्ये १५ ते ७० वयोगटातील सुमारे एक हजार महिलांनी सहभाग घेतला. विविध वयोगटातील महिलांचा एकत्र सहभाग हे या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. यावर्षी प्रथमच ब्ल्यूशाईन ग्रुपच्या वतीने सावित्रीच्या लेकी ही नाटिका देखील सादर करण्यात आली.

नाटकाच्या लेखिका शुभांगी लिहितकर यांनी आपल्या चमूसह ही कलाकृती प्रभावीपणे सादर केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महिलांसह पुरुष मंडळींचाही मोठा सहभाग लाभला. हजारोंच्या संख्येने रसिक प्रेक्षकांनी उपस्थित राहून या महिलांच्या कार्यक्रमास दाद दिली. ब्ल्यूशाईन ग्रुप च्या संचालिका विजया भगत, श्रद्धा कांबळे, अश्विनी दिघाडे, बिना भगत, शुभांगी लिहितकर, प्रीती फुलकर, भाविका मुनेश्वर, वर्षा तामगाडगे, चेतना पाटील, रितू डोंगरे, आकांक्षा शिवणकर, तन्वी मेश्राम, खुशी मेश्राम, संगीता बोरकर, आरती गवई, प्रीती बोरकर, मनोरमा मडके, संजय गुजर, मंगेश भगत, रवी राऊत, रामभाऊ धोंगडे, रोशन भितकर, सूरज बागडे, शंतनु देशभ्रतार आणि ब्ल्यूशाईन ग्रुप यांनी या कार्यक्रमासाठी अनेक दिवसांपासून तयारी केली होती. आजच्या सामूहिक मानवंदनेतून आम्ही केवळ बाबासाहेबांना आदरांजली अर्पण केली नाही, तर पुढच्या पिढीसाठी विचारांचं बीजही पेरलं आहे, असे ग्रुपच्या विजया भगत म्हणाल्या.

येथील भीम गर्जना ढोल ताशा व ध्वज पथक यवतमाळ तर्फे बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देण्यात आली. स्थानिक संविधान चौकात बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी शेकडो महिला, पुरुषांनी गर्दी केली.

## केसातील कोंडा समस्या आणि उपाय



लोकारोग्य

**: हॅलो डॉक्टर :**

मानवी चेहऱ्याचं सौंदर्य खुलत ते डोक्यावरील केसांमुळे. व्यक्ती तितक्या प्रकृती या उक्ती प्रमाणे प्रत्येकाची केशरचना ही निरनिराळ्या पद्धतीची असते. चेहऱ्याच्या सौंदर्याचा एक अविभाज्य भाग असलेल्या याच केसांचे आरोग्य सुधृढ राखण गरजेचं असत. परंतु अनेकांना केसांमध्ये उवा होणे,केस गळती होणे,केसांमध्ये चाई पडणे किंवा टक्कल पडणे असे केसांचे विविध विकार होतात.

यापैकीच अगदी सर्वसामान्य केसांचा विकार म्हणजे केसांमध्ये कोंडा होणे. केसांमध्ये कोंडा होण्याची कारण नेमकी काय? आणि केसांच्या कोंड्यावर उपचार काय आहेत? या संदर्भात त्वचाविकार तज्ञ शैला मराठे यांच्याशी केलेली बातचीत.

**केसातील कोंडा म्हणजे काय?**

■ केसांमध्ये कोंडा होणे हि त्वचेची एक स्थिती आहे,ज्यामुळे टाळूवरील त्वचेवर पांढऱ्या ते करड्या रंगांचे कोरड्या त्वचेचे थर बनतात. ही टाळूवरील त्वचेची एक सामान्य समस्या आहे,जी पुरुष आणि स्त्रियांमध्ये दोघांमध्येही समान परिणाम करते. ही व्यक्तीच्या सामाजिक जीवनावर परिणाम करणारी एक स्तिथी आहे पुरुषामध्ये कोंडा होण्याचे प्रमाण स्त्रियांच्या तुलनेत जास्त आहे. जागतिक पातळीवरील लोकसंख्येच्या ५० टक्के पुरुषांमध्ये कोंडा होण्याची समस्या आढळते.

**कोंडा होण्याची कारण काय?**

■ अनेकांना डोक्यामध्ये सूज असते किंवा खाजवणारी चिकट अशी त्वचा असते. अनेकांना कोरड्या त्वचेमुळे कोंड्याचा त्रास होतो. उन्हाळ्यामध्ये अनेक दिवस डोक्यावरून आंघोळ न केल्याने देखील केसात कोंडा होतो. शाम्पूचा अतिवापर, बुरशीजन्य संसर्ग, केसांच्या उत्पादनांची ॲलर्जी, पुरुषांमधील हार्मोन्सचा अभाव, डोक्यावर तेल लावणे, पक्षाघाताचा किंवा एचआयव्हीचा आजार असेल तरी डोक्यात कोंडा होतो.

**डोक्यात कोंडा होण्याची सर्वसामान्य लक्षण काय असतात?**

■ डोक्यावरील टाळूवरील त्वचेवर मृत त्वचेचे पांढरे, चिकट पापुद्रे येतात. टाळूवर खवले होणे आणि सतत डोक्यात खाज येणे, डोक्यात सौम्य जळजळ किंवा दाह होणे, डोळ्यावर, पापण्यांवर आणि कानाच्या मागे पापुद्रे येतात. कोंडा सहसा टाळूवरील त्वचेवर होतो. त्यामुळे तो मोठ्या प्रमाणावर झाल्यास टायचे पापुद्रे खांदयावर पडतात.

**डोक्यातील कोंड्यावर उपचार काय आहेत?**

■ सर्वात महत्वाचं म्हणजे रोजच्या रोज थंड पाण्याने डोक्यावरून आंघोळ करायला हवी. ज्यांची त्वचा तेलकट असेल अशा लोकांनी डॉक्तरांच्या सल्ल्यानुसार औषधी प्रकारचा शाम्पू वापरावा. केसं शाम्पू करताना केसांच्या रेषेतून कोणतेही स्केल किंवा क्रिस्टो पॅच हळुवारपणे काढून टाका.

केसांचे स्क्रचिंग आणि स्क्रबिंग टाळा. केसाना वरचेवर थंड तेलाने मालिश करा. शिवाय नैसर्गिक मेहंदी लावल्याने देखील केसांमध्ये कोंडा होत नाही. आणि अगदीच जर जास्त प्रमाणात कोंड्याची समस्या असेल तर तज्ज्ञ त्वचाविकार तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. ■

### तुळशीची पान



आपल्याकडे धार्मिक दृष्टिकोनातून तुळशीच्या रोपट्याला खूपच महत्व दिल गेलेलं आहे. अर्थात याच तुळशीचा आपल्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून देखील खूपच उपयोग आहे. तुळशीचे रोपटे आपल्या दारात असणे म्हणजे वातावरणात सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन हवा शुद्ध राहण्यास मदत होतेच परंतु अनेक शारीरिक व्याधींवर तुळस म्हणजे एक रामबाण इलाज आहे. म्हणूनच आयुर्वेदाच्या दृष्टीने तुळस एक महत्वपूर्ण औषध आहे. सध्या कोरोना सारख्या जीवघेण्या विषाणू मुळे संपूर्ण जग भयभीत झालेले असतानां शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी तुळशीची पान खान उपयुक्त आहे. तुळशीच्या बियांमध्ये क्लेवोनाईड आणि फेलोनिक असल्याने आपल्या शरीरातील रोगप्रतिकारक क्षमता वाढण्यास मदत होते. सर्दी पडशाचा आजारावर देखील तुळशीच्या पानांचा चहा हा अत्यंत गुणकारी आहे. तुळशीच्या पानांचा काढा करून प्यायला तरी सर्दी नाहीशी होते. तरुण तरुणींना चेहऱ्यावर मुरुमांचा जो त्रास असतो त्यावर देखील तुळस उपयुक्त आहे. तुळशीची पान संत्र्याच्या सालीत मिसळून थोडे गुलाबजल टाकून एक लेप तयार केला कि हा लेप मुरुमांवर लावल्याने रक्त शुद्धीकरण प्रक्रिया होऊन मुरूम गायब होतात. अशी ही तुळस म्हणजे एक रामबाण औषधी आहे. ■ ■

**10th Annual NUTRITION INDIA SUMMIT 2025 ™**

**द प्रीमियर ग्लोबल न्यूट्रास्युटिकल समिटचे मुंबईत आयोजन**

न्यूट्रिफाय टुडे ८-९ मे रोजी मुंबईतील ट्रायडंट आणि ओबेरॉय हॉटेल्समध्ये चौथे वार्षिक ग्लोबल सी-सुट समफ्लेक्स २०२५ आयोजित करणार आहे. न्यूट्रिफाय टुडेचे उद्दिष्ट मुंबईला दावोसप्रमाणे न्यूट्रास्युटिकल उद्योगाचे जागतिक केंद्र बनवण्याचे आहे. या कार्यक्रमात ब्रँडेड फॉम्युलेशन आणि घटक कंपन्यांचे अधिकारी, प्रसिद्ध वैद्यकीय डॉक्टर, आहारतज्ज्ञ आणि गुंतवणूक बँकर्ससह उद्योगातील ४०० नेते एकत्र येतील.

पिच पब्लिसिटीच्या संस्थापक आणि अध्यक्ष एमी समर्स गुंतवणूक सत्राचे नेतृत्व करतील, तर अनुभवी उद्योग व्यवसाय नेते डॉ. मुकुंद व्यवसाय विकास चर्चांचे निरीक्षण करतील. नियामक तज्ञ डॉ. वैभव कुलकर्णी संचालन करतील आणि प्राध्यापक डॉ. पी.के. राजपूत हे शीर्ष वैद्यकीय डॉक्टरांसह वैद्यकीय सत्राचे नेतृत्व करतील. हे क्युरेटेड सत्र बाजारपेठेचा विस्तार, शाश्वत वाढ आणि विकसित होत असलेल्या नियामक लँडस्केपबद्दल सखोल अंतर्दृष्टी प्रदान करतील. शिखर परिषद व्यवसाय संधी, गुंतवणूक ट्रेंड आणि वैद्यकीय समुदाय आणि न्यूट्रास्युटिकल उद्योग यांच्यातील दरी भरून काढण्यासाठी धोरणात्मक चर्चा करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करेल. हा कार्यक्रम भारताच्या नवीनतम अर्थसंकल्पीय घोषणेनंतर आहे, ज्यामध्ये न्यूट्रास्युटिकल संशोधनातील नवोपक्रमावर लक्ष केंद्रित करून अन्न आणि कृषी पुरवठा साखळींमध्ये $1.1 अब्ज गुंतवणूक समाविष्ट आहे. हे निधी 2047 पर्यंत $100 अब्ज न्यूट्रास्युटिकल बाजारपेठ स्थापित करण्याच्या भारताच्या दीर्घकालीन उद्दिष्टाशी सुसंगत आहे, ज्यामुळे देश विज्ञान-चालित पोषणात जागतिक नेता म्हणून स्थान मिळवेल. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## सहा दुकाने आगीत खाक

■ **महासागर प्रतिनिधी बुलढाणा, दि. १४ :** मलकापूर येथील आठवडी बाजारात काल मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत सहा दुकानें त्यातील मालासह जळून खाक झाली. सुदैवाने जीवित हानी झाली नसली तरी व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. रविवारी मध्यरात्री ही आग लागल्याचे परिसरातील नागरिकांच्या निदर्शनास आले.

स्थानिक रहिवासीयांनी ही माहिती मलकापूर नगर परिषदेचे अधिकारी, अग्निशमन दल कर्मचारी, संबंधित व्यापाऱ्यांना दिली. मात्र या आगीने उग्रस्वरूप धारण केल्याने अस्थायी स्वरूपाची सहा दुकानें त्यातील धान्य व इतर मालसह आगीच्या भक्ष्य स्थळी पडली.आपल्या दुकानांसह गोदाम वाचवण्यासाठी सर्वांची पळापळ सुरू झाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक गणेश गिरी यांच्यासह पोलीस पथकआठवडी बाजार परिसरात दाखल झाले.

मलकापूर नगर परिषदेच्या अग्निशमन दलानेही घटनास्थळी धाव घेत आग विझवण्यास सुरुवात केली. नगर पालिकेचे भोपळे व पोलीस कर्मचारी आनंद माने यांनी सहकार्य केले केले. या आगीत ५ ते ६ दुकाने जळून खाक झाली. तसेच तर इतर दुकानांसह नजिकच्या गोदामांना आगीची झळ पोहोचली. या घटनेत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मात्र, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही . व्यावसायिकांचे मात्र आगीत प्रचंड नुकसान झाले आहे.

# आंबेडकर हेच खरे राष्ट्रपुरुष



### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिवादन

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १४ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त चैत्यभूमी येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्यपाल, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यासह मंत्रिमंडळातील सहकारी आणि प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज आणि देशासाठी केलेल्या कार्याला तोड नाही, तेच खरे राष्ट्रपुरूष होते, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदरांजली अर्पण केली. राज्यपाल सी. पी. राधाक्रिष्णन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह अनेक मंत्र्यांनीही बाबासाहेबांच्या प्रतिमेला माल्यार्पण करीत अभिवादन केले . याप्रसंगी उच्चस्तरीय अधिकारी उपस्थित होते.

## ताडोबात वाघिणीचा मृत्यू



■ **महासागर प्रतिनिधी चंद्रपूर, दि. १४ :** मोहर्ली वनपरिक्षेत्रातील नियतक्षेत्र सितारामपेठ अंतर्गत येत असलेल्या भामडेळी गावालगत इरई धरण परिसरात गस्त करीत असतांना आज (सोमवारी) एक वयस्कर वाघीण मृतावस्थेत आढळून आली. घटनेची माहिती वरिष्ठांना देण्यात आली.

सहाय्यक वनसंरक्षक संकेत वाठोरे, वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष विपे, राज्य वन्यजीव सल्लागार मंडळाचे सदस्य धनंजय बापट, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण प्रतिनिधी बंडू धोतरे, प्रधान मुख्य वनसंरक्षक प्रतिनिधी मुकेश भांदककर, डॉ. कुंदन पोडचेलवार पशु वैद्यकीय अधिकारी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, डॉ. पुरुषोत्तम कडूकर सेवा निवृत्त सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन विभाग, मिलिंद जक्कुलवार, पशु वैद्यकीय पर्यवेक्षक, मोहर्ली तसेच वनपाल व क्षेत्रीय वनरक्षक व पंचासह उपस्थित घटनास्थळी पाहणी केली. सदर वाघाची ओळख पटली नसून त्याचा मृत्यू हा अंदाजे १५-२० दिवसापूर्वी झालेला असावा. ३१ मार्चला शेतकरी यांनी शेतातील पुंजाने जळण्यासाठी लावलेल्या आगीमध्ये इरई धरण परिसरातील गवताळ भागसुद्धा जळलेला आहे.

मृत वाघाचे नखे, दात, हाडे, शाबूत असून आगीमुळे अर्धवट जळाल्याचे दिसून आले. सदरची आग ही वाघाच्या मृत्यू नंतर लागलेली आहे. मृत्यूचे कारण आणि अवयवाचे नमुने सीसीएमबी हैदराबाद येथे पाठविण्यात येणार आहेत.

# कोल्ड्रिंकमध्ये विष मिसळून हत्या

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :** एका अल्पवयीन विद्यार्थ्याची त्याच्याच मित्राने शीतपेयामध्ये विष मिसळून हत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

हत्येनंतर आरोपी मित्राने विद्यार्थ्याच्या घरी पार्क केलेल्या गाडीवर एक पत्र लावून खंडणी मागण्याचा प्रयत्नही केला. ही घटना हुडकेश्वर पोलीस ठाण्याअंतर्गत निळकंठ नगरमध्ये घडली आहे. चार दिवसांनंतर हा प्रकार समोर आला.

वेदांत ऊर्फ विजय कालिदास खंडाते (१७) असे मृताचे नाव आहे तर त्याचा मित्र मिथिलेश चकोले (१८) हा आरोपी आहे. वेदांतने नुकतीच बारावीची परीक्षा दिली होती. त्याचे वडील तंत्रज्ञ असून त्याला बहीणदेखील आहे.

त्याच्या वडिलांनी काही दिवसांअगोदर वडिलोपार्जित शेती विकली. वर्षभराअगोदर ते निळकंठनगरमध्ये रहायला आले. त्यानंतर मिथिलेश व वेदांत चांगले मित्र बनले. वेदांतच्या कुटुंबाकडे पैसा आल्याची माहिती मिथिलेशला होती. मिथिलेश एका गरीब कुटुंबातील आहे व त्याला वेदांतच्या समृद्धीचा हेवा वाटू लागला. कमी वेळात श्रीमंत होण्याच्या विचारातून त्याने खंडणी उकळण्याचा कट रचला.

८ एप्रिल रोजी मिथिलेशने वेदांतला कोल्ड्रिंक पिण्यास जाऊ असे म्हटले. ते एका पानटपरीवर गेले व तेथून कोल्ड्रिंक घेतले. वेदांतच्या नकळत त्याला बेशुद्ध करण्यासाठी मिथिलेशने त्यात झुरळ मारण्याचे औषध मिसळले. ते कोल्ड्रिंक पिल्यावर काही वेळातच वेदांतची प्रकृती बिघडली. त्याच्या कुटुंबीयांनी त्याला सक्करदरातील एका खासगी इस्पितळात दाखल केले. पोलिसांनी एमएलसीच्या आधारे त्याच्या कुटुंबीयांचा जबाब नोंदविला होता.

दरम्यान, १० एप्रिल रोजी वेदांतच्या वडिलांना गाडीच्या बोनेटवर एक पत्र सापडले. त्यात नमूद केले होते की काही दिवसांपूर्वी पिकांच्या विक्रीतून भरपूर पैसे मिळाले असून खंडणीची रक्कम एका ढाब्यावर पोहोचविण्याचे त्यात नमूद होते.

पत्र मिळाल्यानंतर वेदांतच्या कुटुंबाला धक्का बसला. दरम्यान, शनिवारी सकाळी वेदांतचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यांनी हुडकेश्वर पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी अपघाती मृत्यूचा गुन्हा दाखल केला होता.

**कोल्ड्रिंग मध्ये टाकले विष**

मिथिलेशनेही वेदांतसोबत कोल्ड्रिंक प्यायले होते व त्याला काहीही झाले नव्हते. पोलिस चौकशीतही मिथिलेशने तोंड उघडले नाही. पोलिसांनी आत्महत्येच्या दिशेने तपास सुरू ठेवला. शवविच्छेदन अहवालात वेदांतला विषबाधा झाल्याचे उघड झाल्यानंतर पोलिसांनी मिथिलेशला परत चौकशीला बोलविले. त्याला पोलिसी खाक्या दाखविल्यावर त्याने हत्येची कबुली दिली.